आला आला जबरदस्त हिवाळा
। स्वेटर्स । जॅकेट। 2 in 1 जर्किन
। टोपी । ग्लोज । सॉक्स । मफलर
लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी.
ब्रॅण्डेड उत्तम क्वालिटीची कंप्लीट रेंज.
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, पुणे. मो. 7775089505
जरीवाला मेन्स, महाजनवाडी, अहिल्यानगर.मो. 9850216268

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

उत्सव लॉन्स अँण्ड बँक्वेट्स
utsav LAWNS & BANQUETS
सोहळा होईल दिमाखदार
लग्न, साखरपुडा, मौंज, वाढदिवस, कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठी सुयोग्य ठिकाण.
एसी बँक्वेट हॉल | भव्य लॉन | प्रशस्त पार्किंग | AC रूम्स
बुकींग संपर्क - 7410 510 376 | 7385 951 303

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २०.१०.२०२५ | अंक नं. १६९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

शिंगवी ज्वेलर्स प्रा.लि.
या पाडव्याला लक्सराईची खरेदी करा
दागिन्यांच्या घडणावळीवर १००%* पर्यंत डिस्काउंट मिळवा.
67 GOLDEN YEARS
10 ते 100%* पर्यंत डिस्काउंट
तुम्हीच ठरवा तुमचा डिस्काउंट
जिंका सफर सिंगापूरची*
सिटी शोरूम : जुना कापड बाजार, अ.नगर 8087343030
सावेडी शोरूम : प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर 8605500025

सर्व दागिन्यांची
प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
डबल फायदा
जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी
चक्क फ्री*
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर
9272422001/02

SONi TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999

## ।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।



**कै. श्रीमती विमलाबाई बबनराव सग्गम**

कळविण्यास वाईट वाटते की, आमची आई श्रीमती विमलाबाई बबनराव सग्गम यांचे रविवार, दि. १२/१०/२०२५ रोजी निधन झाले.

सहवास जरी सुटला, तरी स्मृती सुगंध देत राहतील...
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुमची आठवण येत राहील...

**दशक्रिया विधी-** मंगळवार, दि. २१/१०/२०२५ रोजी सकाळी ८.०० वा. रामकुंड, नाशिक येथे होईल.

**अकरावा दिवस -** बुधवार, दि. २२/१०/२०२५ रोजी दु. १२.०० वा. राहत्या घरी.

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण आदरांजली...

-: शोकाकूल :-
संतोष बबनराव सग्गम, सागर बबनराव सग्गम
व समस्त सग्गम परिवार, अहिल्यानगर

दिपावलीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

## सुट्टीची सूचना

दिपावलीनिमित्त दैनिक नवा मराठा कार्यालयास मंगळवार दि.२१ ऑक्टोबर २०२५ ते शनिवार दि.२५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सुट्टी राहील.. सोमवार दि.२७ ऑक्टोबर २०२५ पासून अंक नियमित प्रसिध्द होईल. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेते यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त स्कीन ट्रिटमेंट
लेझर हेअर ट्रिटमेंट । केमिकल पिलींग
स्किन पॉलिशींग । लेसर ट्रिटमेंट (सोरायसीस, मुरुम, कोड)
Laser for Scars * Laser for Vitiligo & Psoriasis
Gentle Yag Laser
Harmony XL Pro
अद्वैत क्लिनीक अँण्ड कॉस्मेटीक लेसर सेंटर

Since 1996 ™
R B ELECTRONICS
सर्व प्रकारचे झेरॉक्स मशीन व हेवी प्रिंटर सेल & सर्व्हिस
स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्स मागे, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9822595890 9922223434

40 सालों का भरोसा
Varsha® Real Product. Real Value.
दीपावलीच्या मन:पूर्वक शुभेच्छा!
अटूट रिश्ता ज़िंदगी भर का
Unbreakable Product Range
Ghamela Range | Bucket Range | Tub Range | Dustbin Range
Stool Range | Planter Range | Milkcan Range | Chair Range
Cleaning Product Range
Brush Range | Wiper Range | Mop Range | Broom Range
200+ PRODUCT RANGE
100% UNBREAKABLE
Unbreakable Household | Cleaning Products | Garden Pipes | Furniture | HDPE Pipes | Sprinklers
आता वर्षा अनब्रेकेबल प्लॅस्टिकची उत्पादने सर्वत्र उपलब्ध
varshaplastics.com
info@varshaplastics.com
SIMPLY SMART CLEANING
PAN INDIA NETWORK

।।श्री।।
शुभ दिपावली
''लक्ष्मीपुजन'' ... सोबत हवे लक्ष्मी संवर्धन...
त्यासाठी करा ''म्युच्युअल फंड'' गुंतवणुकीचे नियोजन !
(Mutual funds investments are subject to market risks, please read all scheme related documents carefully before investing)



आपणा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
Deshpande Investments
The Mutual Fund House
Sonanagar Chowk, Savedi, Ahilyanagar
e-mail : deshpandeinvestment@gmail.com
राजेश देशपांडे
संचालक
(9850724890)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शेतीची खरेदी देण्याचे आमिष दाखवून नऊ लाख रुपयांची फसवणूक

नगर – शेती विकत देतो असे आमिष दाखवून एका महिलेची नऊ लाख चार हजार रूपयांची फसवणूक केल्याची घटना नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे उघडकीस आली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निकिता सचिन धामणे (वय २९, रा. सारोळा कासार, ता. नगर) असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव असून त्यांनी १८ ऑक्टोबर रोजी फिर्याद दिली आहे.

सदरची घटना ११ जून २०२५ ते ६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान सारोळा कासार शिवारात घडली आहे. मनोहर गुलाब काळे, सुरेखा मनोहर काळे, संतोष गुलाब काळे, अलका संतोष काळे (सर्व रा. सारोळा कासार, ता. अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

निकिता यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, संशयित आरोपी मनोहर काळे, सुरेखा काळे, संतोष काळे आणि अलका काळे यांनी फिर्यादी व त्यांचे पती सचिन दत्तात्रय धामणे यांचा विश्वास संपादन करून आमच्या शेतीपैकी १२ एकर शेती तुम्हाला विकतो असे सांगितले. यावर विश्वास ठेवून धामणे दांपत्याने वेळोवेळी ऑनलाईन पध्दतीने एकूण नऊ लाख चार हजार रूपये संशयित आरोपींना दिले. मात्र ठरल्याप्रमाणे शेतीचा व्यवहार पूर्ण न करता संशयित आरोपींनी तीच जमीन इतर व्यक्तीला विकून धामणे दांपत्याची फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

पोलिसांनी निकिता धामणे यांच्या फिर्यादीवरून चौघांविरूध्द फसवणूक व इतर कलमान्वये गुन्ह्याची नोंद केली असून अधिक तपास पोलीस अंमलदार खेडकर करीत आहेत.

# नविननियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षण एप्रिल अखेरीस घ्यावे

पुणे – राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या नविननियुक्त शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण दिवाळीच्या सुट्टीत न घेता एप्रिल महिन्याच्या अखेरीस आयोजित करावे, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT), पुणे येथील संचालक राहुल रेखावार यांना याबाबतचे निवेदन शिक्षक भारती संघटनेच्या वतीने देण्यात आल्याची माहिती शिक्षक भरतीचे राज्यसचिव सुनील गाडगे यांनी दिली.

सदर निवेदनात सांगण्यात आले की, दिवाळी सुट्टी ही शिक्षकांसाठी कौटुंबिक एकत्रतेची आणि मानसिक विश्रांतीची संधी असते. राज्यभर नविन नियुक्त शिक्षक विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत असून, त्यांना वर्षभरात केवळ दोनदाच त्यांच्या मूळ गावी जाण्याची संधी मिळते. अशा पार्श्वभूमीवर, शिक्षक भारती संघटनेच्या वतीने करण्यात आलेल्या निवेदनात दिवाळीच्या काळात प्रशिक्षण आयोजित करणे अन्यायकारक असून, त्याऐवजी एप्रिल महिन्याच्या अखेरीस प्रशिक्षण घेण्यात यावे,

सुनील गाडगे यांनी सांगितले की, शिक्षक समाज घडवणारा कणा आहे. नविननियुक्त शिक्षकांसाठी प्रशिक्षण अत्यावश्यक असले तरी त्याचे वेळापत्रक मानवतेच्या दृष्टिकोनातून असावे. एप्रिल अखेरीस बहुतेक शाळांचे शैक्षणिक सत्र पूर्ण झालेले असते. त्यामुळे त्या काळात प्रशिक्षण घेतल्यास शिक्षक उपस्थितीही चांगली राहील व त्याचा दर्जाही वाढेल.

गाडगे पुढे म्हणाले, सध्या शिक्षकांवर विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या असतानाच मानसिक तणावही वाढत आहे. सणासुदीच्या काळात शिक्षकांना त्यांच्या कुटुंबासोबत वेळ घालवण्याची गरज असते. म्हणूनच शिक्षक भारती संघटनेच्या वतीने आम्ही विनंती करतो की, MSCERT आणि शिक्षण विभागाने सहानुभूतीपूर्वक विचार करून हे प्रशिक्षण एप्रिल अखेरीस आयोजित करावे.

या निवेदनप्रसंगी शिक्षक भारती संघटनेच्या अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप (जिल्हाध्यक्ष, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक), विजय कराळे (जिल्हा सचिव), महेश पाडेकर (पुणे विभागीय कार्याध्यक्ष), संजय पवार, सोमनाथ बोंतले, आशा मगर (जिल्हा महिला अध्यक्ष), संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, सुदाम दिघे, मोहंमद समी शेख (उर्दू जिल्हाध्यक्ष), रामराव काळे (उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष), संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर विभावरी रोकडे (सचिव), मीनाक्षी सूर्यवंशी (कार्याध्यक्ष), रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रुपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित शिक्षक भारतीच्या राज्याध्यक्षा रुपाली कुरूमकर यांचा समावेश होता.

## शशिकलाबाई भळगट यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पूनममोतीनगर येथील एलोरा अपार्टमेंटमधील रहिवासी शशिकलाबाई पोपटलाल भळगट (रुईछत्तीशीवाला, वय ७५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. १८ ऑक्टोबर रोजी त्यांच्यावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या मनोज, दिनेश, शिल्पा यांच्या मातोश्री होत.

## ॲड. नितीन गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील कोर्टा समोरील श्री झेरॉक्सचे मालक ॲड.नितीन बाळासाहेब गायकवाड (वय ६३) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, ४ भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

बस स्टॅण्ड समोरील पूर्वीचे अष्टविनायक झेरॉक्सचे मालक सुनिल गायकवाड, कर्मवीर चौकातील राम झेरॉक्सचे मालक सोमनाथ गायकवाड, मेनरोड येथील नितीन झेरॉक्सचे मालक संतोष गायकवाड व छत्रपती शिवाजी महाराज चौकातील समर्थ झेरॉक्सचे मालक श्रीराम गायकवाड यांचे बंधू, पुणे येथील आयटी इंजिनीयर श्रीप्रसाद गायकवाड यांचे वडील, राजेंद्र व श्रीधर गायकवाड यांचे चुलत बंधू, महेश, निखिल, स्वप्निल, तेजस व सिद्धांत गायकवाड यांचे चुलते होत.

# फटाके मुक्त दिवाळी साजरी करा

### गोरक्षनाथ गवते यांचे आवाहन; पर्यावरणातील हस्तक्षेपामुळे अतिवृष्टी, ढगफुटी मानवनिर्मित



नगर – पर्यावरणाचे संतुलन राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. दिवाळीसारख्या सणांमध्ये फटाक्यांचा अतिरेक करून आपणच निसर्गाचे नुकसान करतो. त्यामुळे प्रत्येकाने पर्यावरणपूरक आणि फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन पर्यावरण रक्षक गोरक्षनाथ गवते यांनी केले आहे.

गवते म्हणाले की, फटाक्यांच्या मोठ्या आवाजामुळे ध्वनीप्रदूषण तर होतेच, पण विषारी दारू आणि स्फोटक पदार्थांमुळे वायूप्रदूषण वाढते. या प्रदूषणाचा परिणाम फक्त माणसावर नाही तर लाखो प्राणी, पक्षी आणि निसर्गावर होतो. फटाक्यांचा आवाज व धूर यामुळे पक्षी व प्राणी घाबरतात, त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयी विस्कळीत होतात आणि अनेकदा ते मृत्युमुखी पडतात. हेच प्राणी-पक्षी पर्यावरणाचे निर्देशक आहेत, त्यामुळे त्यांचे रक्षण करणे हे आपल्या अस्तित्वासाठी आवश्यक आहे.

गवते यांनी पुढे सांगितले की, फटाके फोडण्यावर खर्च होणारा पैसा जर आपण अनाथ मुलं, मुली, वृद्धाश्रम किंवा गोशाळांना मदतीसाठी दिला, तर तो आनंद द्विगुणीत होईल. पर्यावरणाचे रक्षण आणि मानवतेची सेवा या दोन्ही गोष्टी एकत्र साधता येऊ शकतात. प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करून माझे पर्यावरण, माझी जबाबदारी! या भावनेतून प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करावी, अशी विनंतीही त्यांनी सर्व जनतेला केली.

जागतिक पर्यावरण विकास सरकारचे राष्ट्रीय अध्यक्ष गोरक्षनाथ गवते यांनी पुढे सांगितले की, आज देशातील काही भाग दुष्काळाने तर काही भाग अतिवृष्टी व ढगफुटीने त्रस्त आहेत. ही परिस्थिती नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे. आपण निसर्गाच्या नियमांमध्ये सतत हस्तक्षेप करत आहोत जंगलतोड, औद्योगिक प्रदूषण, नद्यांचे अतिक्रमण यामुळेच या आपत्ती वाढल्या आहेत. जर आपत्ती टाळायच्या असतील तर निसर्गाचा सन्मान राखणे आणि पर्यावरणाचे रक्षण करणे अपरिहार्य आहे.

गोरक्षनाथ गवते हे २०११ पासून पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांच्या उपक्रमांमध्ये एक विद्यार्थी एक झाड, कुऱ्हाडबंदी, डी.जे.बंदी, प्लास्टिकबंदी, व्यसनबंदी, हुंडाबंदी, शिकारबंदी, भ्रष्टाचारबंदी आदी जनजागृती मोहिमांचा समावेश आहे. तसेच त्यांनी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव, घर तेथे शौचालय, विषमुक्त शेती, रोगमुक्त भारत, बेटी बचाव बेटी पढाव, पाणी आडवा पाणी जिरवा, वायू व जलप्रदूषण बंदी यासारखी अनेक मोहिमा राबवून समाजात पर्यावरणप्रेम जागवले आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा पर्यावरण रक्षक नागरिक आहे, असे सांगत त्यांनी शाळा आणि महाविद्यालयांमधील युवकांमध्ये पर्यावरणाबद्दल जाणीव निर्माण करण्याचे आवाहन केले आहे.



कार्तिक बनकर याने प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल मिळविले. त्याची मुंबई (विरार) येथे होणाऱ्या स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

## रोलर स्केटिंगमध्ये नगरच्या कार्तिक बनकरचा प्रथम क्रमांक; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

नगर – अहिल्यानगर जिल्हा रोलर स्केटिंग संघटनेच्या वतीने १९ ऑक्टोबर रोजी प्रियदर्शनी पब्लिक स्कूल, भिंगार, अहिल्यानगर येथे राज्यस्तर स्केटिंग स्पर्धेसाठी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १२ ते १५ वर्षे वयोगटांमध्ये कार्तिक बनकर याने प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल मिळविले. त्याची मुंबई (विरार) येथे होणाऱ्या स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेसाठी शुभम सर व प्रमोद सर यांनी मेहनत व सराव घेतला होता. तुमच्या सततच्या मार्गदर्शनामुळे कार्तिकला हा यशस्वी टप्पा गाठण्यास मदत झाली. या यशासाठी प्रशिक्षक शुभम, प्रशिक्षक प्रमोद व प्रशिक्षक अमोल धोपावकर यांचे सहकार्य लाभले.

## विनोद कातोरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – कामरगाव येथील रहिवासी चैतन्य कानिफनाथ देवस्थानचे सेवेकरी विनोद सर्जेराव कातोरे (दगडुशेठ, वय ४४) यांचे १८ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कामरगाव स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, पत्नी, १ मुलगा, २ मुली असा परिवार आहे.

## विनय शिवरात्री यांचे हृदयविकाराने निधन



नगर – येथील पाईपलाईन रोड येथील श्रीराम चौकातील रहिवासी व्हिडीओग्राफर विनय नारायण शिवरात्री (वय ४४) यांचे १९ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली असा परिवार आहे.

# भाऊबीजेच्या दिवशी अहिल्यानगर शहरामध्ये विश्वशांतीसाठी गुंजणार प्रभु महावीरांची स्तुती

### २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.३० वाजता महात्मा फुले चौकात विशेष आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन



नगर – अहिल्यानगर जिनेश्वरी ग्रुप तर्फे एक अनोखा आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम भाऊबीजेची पवित्र प्रभात या शिर्षकाखाली सकाळी ६:३० वाजता, महात्मा फुले चौक, अहिल्यानगर येथे पार पडणार आहे.

या प्रसंगी संपूर्ण भारतभर एकाच वेळी अनेक शहरात, गावात पुच्छीसूणं प्रभु महावीरांची मंगल स्तुती (वीर स्तुती)चे एकाच स्वरात, हजारो भक्तांच्या सहभागातून गुंजणार आहे. आयोजकांच्या माहितीनुसार, जेव्हा संपूर्ण भारतभर एकाच वेळी पुच्छीसूणं (वीर स्तुती) चे उच्चारण होईल, तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या शुभस्पंदनामुळे वातावरण मंगलमय आणि शांततामय बनेल. ही मंगल प्रार्थना दुःख, अशांती आणि अमंगल दूर करून आनंद, समृद्धी व सकारात्मकतेचा संदेश देणारी ठरेल.

देशभरातील जवळपास २००० आराधक समूह या सामूहिक आराधनेत सहभागी होणार असून, या माध्यमातून एक अद्वितीय आध्यात्मिक कंपन निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. जिनेश्वरी ग्रुपच्या म्हणण्यानुसार, ही केवळ धार्मिक प्रार्थना नाही, तर आत्मशुद्धी आणि सामूहिक मंगलाच्या दिशेने एक आध्यात्मिक चळवळ आहे. आचार्य आनंदऋषी म.सा. यांच्या आशीर्वादाने तसेच उपाध्याय प्रवीणऋषीजी महाराजांच्या संकल्पना व प्रेरणेतून जिनेश्वरी गृप आयोजित करीत आहेत. हा कार्यक्रम अगदी वेळेवर होईल.

## विनायकनगर येथून दुचाकीची चोरी

नगर – विनायकनगर येथील अरिहंत टॉवर च्या पार्किंग मध्ये लावलेली बजाज कंपनीची पल्सर मोटारसायकल (क्र.एमएच १६ बीपी २२२०) अज्ञात चोरट्याने चोरून १६ ऑक्टोबर रोजी रात्री ११ ते १७ ऑक्टोबर रोजी पहाटे १ या कालावधीत घडली आहे.

याबाबत विकास अंकुश बेरड (वय २२, रा. राज हॉस्पिटलजवळ, सारसनगर) याने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.







## नगर-दौंड रोडवर पिकअप-ट्रेलर अपघात; एकाचा मृत्यू

नगर – भरधाव वेगातील पिक अप ने रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या ट्रेलर ला पाठीमागून जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात पिकअप मधील एकाचा मृत्यू झाला तर चालक जखमी झाला आहे. हा अपघात नगर – दौंड रोडवर बाबुर्डी बेंद फाट्यावर (ता.नगर) १८ ऑक्टोबर रोजी घडला. सुरज संजय शेलार (रा. काष्टी, ता.श्रीगोंदा) असे यातील मयताचे नाव आहे.

याबाबत ट्रेलर चालक अनिकेत कल्याण सुपेकर (रा. भालगाव, ता. पाथर्डी) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे दौंड रोड ने नगर कडे येत असताना बाबुर्डी बेंद फाट्यावर त्यांनी रस्त्याच्या कडेला ट्रेलर उभा केला होता. त्यावेळी श्रीगोंद्याकडून नगरकडे भरधाव वेगात आलेल्या महिंद्रा पिक अप ने ट्रेलर ला पाठीमागून जोराची धडक दिली. या धडकेत पिकअप मधील सुरज संजय शेलार (रा. काष्टी, ता.श्रीगोंदा) हे मयत झाले तर चालक जखमी झाला. या फिर्यादी वरून पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# 'महाराष्ट्र बालक मंदिर शाळेमधील' चिमुकल्यांकडून वस्तुरूपात मदत देऊन वंचितांचे अश्रू पुसण्याचे काम

### निर्मला केदारी यांचे प्रतिपादन



लालटाकी रस्त्यावरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेतील मुलांनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी आयडियल हेल्पिंग फाउंडेशन या सेवाभावी संस्थेकडे भेटवस्तू सुपूर्त केल्या. (छाया – उदय जोशी)

नगर – समाजातील आपले जीवन एकाएकी व्यथित करणाऱ्या बेघर असलेल्या अनाथ, स्वतः चे पोट भरण्यासाठी गावोगावी भटकंती करणाऱ्या या सर्व लोकांसाठी महाराष्ट्र बालक मंदिरातील विदयार्थ्यांनी मदतीचा हात देऊन समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे महाराष्ट्र बालक मंदिर यांनी वस्तुरूपात मदत देऊन अनेक वंचितांचे अश्रू पुसण्याचे काम केले आहे आणि आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशन ग्रुप या सर्व वस्तू या वंचितांना दिवाळी साजरी करण्यासाठी सुपूर्त करणार आहे. ज्या छोट्याशा हातांनी वंचितांची आठवण ठेवून त्यांनाही दिवाळी साजरी करता यावी. ही एक दान देण्याची उत्कृष्ट भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यात आली आहे. ही बाब कौतुकास्पद व समाजासाठी नक्कीच प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन आयडियल हेल्पिंग फाउंडेशनच्या अध्यक्षा निर्मला केदारी यांनी केले.

लालटाकी रस्त्यावरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेतील मुलांनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी आयडियल हेल्पिंग फाउंडेशन या संस्थेकडे भेटवस्तू सुपूर्त केल्या. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा निर्मला केदारी, सचिव सौ.संगीता साळवी, सदस्य मंदा पोळ, नर्सिंग कोर्सच्या शिक्षिका मंदा बडे, रिबेका अब्राहम, मुख्याध्यापिका अर्चना गिरी आदी उपस्थित होते. इयत्ता पहिली ते चौथीचे विद्यार्थ्यानी फटाके मुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली तसेच पर्यावरणपूरक आकाशकंदील व सैनिकाकरीता स्वत: भेटकार्ड तयार केली.

मुख्याध्यापिका अर्चना गिरी म्हणाल्या आम्ही फक्त भेटवस्तू देऊन खारीचा वाटा उचलत असून शाळा नेहमीच समाजोपयोगी व दरवर्षी फटाके मुक्त दिवाळी साजरी करून त्या पैशाचा विनियोग सामाजिक कामासाठी करतो. दुसऱ्या मदत करण्याची भावना व मदत करणे यात फरक आहे दुसऱ्या मदत करण्याचे काम आमच्या चिमुकल्यांनी केले आहे या वयात मिळणारे संस्कार आयुष्यभर पुरतात दिवाळी हा सण एकमेकांना आनंद देण्याचा आहे अश्या वंचित घटकाना, दिनदुबळयांना मदत करण्याकरीता हा दरवर्षी सातत्याने हा उपक्रम करत आहोत यास पालकाचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. लहान वयात दुसऱ्याला काहीतरी देण्याची सवय लागावी हा उदात्त हेतुने आम्ही केले. आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशन ग्रुप जे समाजासाठी करत ते कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे

संगीता साळवी म्हणाल्या आयडियल हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशन हा ग्रुप कोरोना काळापासून २०१९ पासून समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचून ग्राउंड लेवलला काम करत आहे. त्याच्या माध्यमातून अनेक वंचितांपर्यंत पोहोचून त्यांच्या गरजा पूर्ण करत आहे. फूड मिनिस्ट्रीच्या माध्यमातून अनेक रस्त्यावरील वंचितांना फूड पॅकेट वाटण्याचे काम वीकेंडला करत आहे.

सुत्रसंचालन सुनीता शेवाळे यांनी केले. संस्थेचे सर्व विश्वस्तानी या उपक्रमाचे कौतुक केले.

हा उपक्रम यशस्वितेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विदयार्थी, पालक यांनी परीश्रम व मोलाचे सहकार्य केले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### चहा जरुर प्या पण...

दिवसभर काम करून थकलो तरी आपण स्वतःला उत्साही वाटण्यासाठी चहाचा एक घोट घेतो. काही लोकांचा दिवस चहाशिवाय सुरू होत नाही. काही लोक दिवसाच्या सुरुवातीला चहा घेतात. पण सकाळी काहीही न खाता चहा पिणे चांगले मानले जात नाही. यामुळे पोटाच्या आतील थरावर आम्लाचा प्रभाव वाढतो, ज्यामुळे आम्लपित्त होते. जर तुम्हाला सकाळी चहा प्यायला आवडत असेल, तर नाश्त्यानंतर अर्धा तासाने चहा घ्या किंवा चहापूर्वी मूठभर मखाना किंवा काही सुकामेवा खा. जर तुम्हाला चहा पिल्यानंतर आम्लपित्त होण्याची तक्रार असेल, तर तुम्ही खूप जास्त चहा घेत असाल. जेव्हा तुम्ही वारंवार चहा पिता तेव्हा आम्लपित्ताची समस्या उद्‌भवू शकते. म्हणून दिवसातून एक किंवा दोन कपपेक्षा जास्त चहा घेऊ नका. तसेच रात्री उशिरा चहा पिणे टाळा.

## पाककला

### मशरुम पनीर पिझ्झा

**साहित्य :** २०० ग्रॅम पनीर, ६/७ मशरुम, १ कप सिमला मिरची, ३/४ कप मोठ्ठा टोमॅटो, १ कप कांदा, ३/४ कप गाजर, ३/४ कप कोबी, १ टेबलस्पून ऑरीगानो, १ टेबलस्पून चिलीफ्लेक्स, चिली सॉस, ८ पिझ्झा बेस, २०० ग्रॅम मोझारोला चीज, पिझ्झा टॉपींग, टोमॅटो केचप,

**कृती :** सव भाज्या चिरून घ्या. आधी भाजी करुन घेऊयात. कढईत १ टेबलस्पून बटर घाला नी त्यात सर्व भाज्या घालून परतून घ्या. ओरीगानो, चिलीफ्लेक्स मीठ घाला भाजी थोडी कोरडी करा. पीझ्झा बेस घ्या नी तव्यावर टॉपींग ठेवणार ती बाजू थोडी शेकून घ्या. आता त्यावर पीझ्झा सॉस लावा नंतर भाजी घाला नी वरती पनीर तुकडे घाला. थोडा चिली सॉस घाला, वर चीज किसून घाला. आता पिझ्झा तव्यावर ठेवा नी वरती कढई झाका मंद आचेवर १० मिनीटे होऊ द्या. मशरूम पनीर पिझ्झा तयार आहे. कट करा नी सॉस बरोबर खायला द्या.

## वास्तू

✻ एकादशीच्या दिवशी तांदूळ खाणे खाणे निषिद्ध मानले जाते. त्याच बरोबर दिवाळी, शरद पौर्णिमा, शीतलाष्टमी, नागपंचमी आणि कोणाच्या मृत्यूच्या दिवशी घरात पोळी बनवली जात नाही. हा नियम पाळला नाही तर आई अन्नपूर्णा रागावते. अशा लोकांना अन्न आणि पैशाची कमतरता भासू लागते.

✻ पोळी बनवताना काही वास्तु नियम ही लक्षात ठेवले पाहिजेत. तुम्ही ज्या स्टोव्हवर अन्न शिजवता तो तुमच्या स्वयंपाकघराच्या आग्नेय कोपऱ्यात असावा. पोळी बनवताना तुमचे तोंड पूर्वेकडे असावे.

✻ पहिली पोळी नेहमी गायीला द्यावी. जर तुम्ही गायीला खाऊ घालू शकत नसाल तर तुम्ही पहिली पोळी किंवा भाकरी कुत्र्याला खायला देऊ शकता. गाय किंवा कुत्र्याने पोळी खाल्लयाने त्या घरात राहणाऱ्या लोकांच्या सर्व समस्या दूर होतात.

## सल्ला

✻ माश्या पुदिना आणि तुळशीच्या सुगंधाने पळून जातात. घरात तुळस किंवा पुदिन्याचे रोप ठेवा किंवा त्यांचे तेल फवारणी करा.

✻ दररोज सकाळी किंवा संध्याकाळी काही वेळ कापूर जाळणे. त्याचा वास केवळ माश्याच नाही तर डासांनाही दूर करतो.

## सौंदर्य

मीठाच्या पाण्याने चेहरा धुणे हा एक नैसर्गिक आणि सोपा मार्ग आहे जो त्वचेचे आरोग्य सुधारू शकतो. मीठात दाहक-विरोधी आणि जीवाणूरोधी गुणधर्म असतात जे त्वचेच्या समस्या कमी करण्यास मदत करू शकतात. मीठाच्या पाण्याने चेहरा धुतल्याने मुरुमांच्या समस्या कमी होतात आणि त्वचेचे आरोग्य सुधारते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर २०२५

**लक्ष्मी कुबेर पूजन, दर्श अमावास्या, महावीर निर्वाण दिन, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, चित्रा २२।५९, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** शत्रुपक्ष हावी राहील. एखाद्या चुकीला पुन्हा करु नका. मार्ग प्रशस्त होईल.

**वृषभ :** आरोग्यात सुधारणा. आर्थिक स्थितीत बचत आणि निवेशाचे योग येतील. लाभदायी करार होतील.

**मिथुन :** आर्थिक आणि सामाजिक कामांमध्ये अडथळे. कामांची गती मंदावेल. शांत रहा. लाभदायक बातमी कळेल.

**कर्क :** संपत्तीच्या कामात यश मिळण्याचे योग. मनात नवीन कल्पना सुचतील. आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल.

**सिंह :** आपली स्थिति, वास्तविकता वाढेल. पारिवारिकदृष्ट्या वेळ सामान्य. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या :** उत्साह, आत्मविश्वास वाढेल. अडकलेला पैसा मिळेल. खासगी कामाकडे जास्त लक्ष द्याल.

**तूळ :** अडकलेला पैसा मिळेल. अस्तिक लोकांसाठी शुभ. गैरसमज दूर होतील. व्यर्थ ताण जाणवेल.

**वृश्चिक :** आपल्या कामांची समाजात चर्चा होईल. आपल्या बुद्धि आणि तर्काने कार्यात यशाची शक्यता.

**धनु :** आपल्या प्रयत्नाने उन्नति कराल. धनलाभ होईल. वरिष्ठांची मर्जी राहील.

**मकर :** पाठबळ मिळेल. मनाला प्रसन्नता वाटेल. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. मित्रांकडून आर्थिक लाभ होईल.

**कुंभ :** आपली दूरदृष्टि आणि बुद्धिने अडकलेली कामे पूर्ण होतील. सामाजिक यश. नवीन कार्य सुरू करू नका.


**मीन :** काळजीपूर्वक काम करा. कोणतेही काम एखाद्यावर विसंबून राहून करू नका. आरोग्य नरम-गरम राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२८८ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२८७ चे उत्तर



**आडवे शब्द :** १) ज्यू लोकांचा देश ४) भजन वगैरे करीत देवाच्या नावाने रात्र काढणे ६) निवडणुकीतील मुख्य प्रक्रिया ८) पात्र; योग्य १०) हक्कदार; शत्रू; फिर्यादी; दुष्मन १२) अलंकार; संच; सरंजाम; पखवाज १३) एक छोटा भित्रा जंगली प्राणी १४) पत्त्यातील एक डाव १५) प्रतिस्पर्ध्यावर केलेला वरचढपणा १७) मत्सर; द्वेष १९) उणीव; कमतरता; कसर २०) बसण्यासाठीचे छोटे वस्त्र २२) याग; होमहवन; मख; यजन २३) सोन्याचांदीच्या दागिन्यांचा व्यवसाय करणारा २४) ऐसपैस घातलेली मांडी

**उभे शब्द :** १) अगदी छोटा २) भाषेचा एक अलंकार ३) वाईट सवय; खोड ४) मुंज झाल्यानंतर गळ्यातून खांद्याद्वारे खाली सोडतात तो दोरा; यज्ञोपवीत ५) बेतासबेत; जमा आणि खर्च यांची बरोबरी ७) पुरुषाचे एक आदरार्थी टोपणनाव ९) मालक; पती; यज्ञ करणारा ११) दरवाजा; कवड; द्वार १६) कोठीवर नृत्य करणारी स्त्री १८) उत्पन्नाचा हिशोब; फडशा; निकाल १९) वडिलोपार्जित चालत आलेला संपत्तीचा हक्कदार २१) कागदावर किंवा वाळूवर रेषा मारून शकुन पाहण्याची विद्या

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** वेळ कुणासाठीही थांबत नाही त्यामुळे वेळ खर्च करताना तो व्यक्ती त्यासाठी योग्य आहे का याचा नेहमी विचार करा.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## हिऱ्याला व्यवहारात एवढे महत्त्व का प्राप्त झाले?

माणसाला हिऱ्याबद्दल फार पूर्वीपासूनच आकर्षण वाटत आले आहे. अगदी मानवी संस्कृतीच्या सुरुवातीपासून हिरा मौल्यवान मानला जातो. तसेच तो अतिशय कठीण असतो हेही आपल्याला पूर्वीपासून ठाऊक होते. पूर्वी फक्त राजे-रजवाडे व अतिशय धनाढ्य माणसेच हिरे वापरत. रत्नांच्या व खड्यांच्या मानाने हिरे खूपच दुर्मीळ होते. त्याचबरोबर ते पैलू पाडल्यावर अतिशय आकर्षक दिसायचे. त्यातच हिऱ्याला पैलू पाडणे हे महाकठीण आणि तितकेच नाजूक काम ! कठीणपणामुळे हिरा अक्षरश: हजारो वर्षे न झिजता राहू शकतो. त्याच्या तेजावरही वयाचा परिणाम होत नाही की, त्यावर चरेही पडत नाहीत.

अर्थात पैलू पाडेपर्यंत हिरा इतका सुंदर दिसेलच असे नाही. गारगोटी व हिरा यांच्यातला फरक कळायला तज्ज्ञ माणसाचीच आवश्यकता असते. तसेच पैलू पाडण्यासाठीही तज्ज्ञ माणसाची गरज असते.

हिऱ्याची किंमत, त्याचा आकार, वजन, पैलू आणि रंग यांवर ठरते. हिरा पांढरा, तांबूस निळसर किंवा पिवळी छटा असलेला असू शकतो. काळे व कमी प्रतीचे हिरे औद्योगिक हिरे म्हणून वापरले जातात. आजकाल औद्योगिक हिरे कृत्रिमरीत्याही निर्माण करता येतात. भारतात सुरत शहरात नि आसपासच्या भागात हिऱ्यांना पैलू पाडण्याचा मोठा व्यवसाय असून दरवर्षी या व्यवहारात ६० कोटी रुपयांची उलाढाल होते. भारतीय कारागीर हिऱ्याला पैलू पाडण्यात वाकबगार म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. भारतात पन्ना इथे, आणि वज्रकरूर या ठिकाणी हिरे सापडतात.

## राक्षसाची भिती

माझ्या पाठीवर चढला. पण आता पर्याय नव्हता. लगाम आधीच त्याच्या तोंडात होता. चोराच्या हातात चाबूक होता. चाबूक त्याला लागताच तो पळून गेला. काही अंतर गेल्यावर, चोराने घोड्याला थांबवण्यासाठी लगाम ओढला, पण घोडा धावत राहिला. कमी होण्याऐवजी त्याचा वेग वाढतच गेला. मग, चोराला संशय आला की हा घोडा नाही तर घोड्याच्या रूपातील राक्षस आहे, जो मला मारू इच्छितो. तो असा विचार करत असतानाच, वडाच्या झाडाची एक फांदी त्याच्या समोर आली. घोडा त्याखाली गेला. चोराला घोड्यापासून पळून जाण्याचा मार्ग सापडला आणि त्याने दोन्ही हातांनी फांदी पकडली. घोडा खाली गेला, चोर झाडाच्या फांदीवर लटकून वाचला. घोड्यासारख्या राक्षसाचा एक मित्र माकड त्याच झाडावर राहत होता. त्याने घाबरून पळून जाणाऱ्या घोड्यासारख्या राक्षसाला बोलावले आणि म्हणाला- मित्रा! तू का घाबरतोस? हा राक्षस नाही तर एक सामान्य माणूस आहे. तुला हवे असेल तर तू त्याला खाऊ शकतोस.

चोर माकडावर खूप रागावला. माकड त्याच्यापासून दूर एका उंच फांदीवर बसला होता. पण त्याची लांब शेपटी चोराच्या चेहऱ्यासमोर लटकत होती. रागाच्या भरात चोराने त्याची शेपटी दातांनी दाबून चावू लागला. माकडाला खूप वेदना होत होत्या पण तो त्याच्या मित्र राक्षसाला चोराची ताकद दाखवण्यासाठी तिथेच बसून राहिला. तरीही त्याच्या चेहऱ्यावर वेदनेची छाया स्पष्ट दिसत होती. त्याला पाहून राक्षस म्हणाला - मित्रा! तू काहीही बोललास तरी तुझा चेहरा सांगत आहे की तू एका भयानक राक्षसाच्या तावडीत सापडला आहेस. असे म्हणत तो पळून गेला.

तात्पर्य : कोणत्याही गोष्टीची शहानिशा केल्याशिवाय त्यावर विश्वास ठेऊ नये. (पूर्ण)

# जीवन का अमृत (भाग १)



भजन-सिमरन के बाद हम कभी भी अस्वस्थ महसूस नहीं करते । मीठी याद का और सही तरीके से की गई साधना का असर तो इसके विपरीत होता है; हम शांति और आनंद महसूस करते हैं। हमारे पास जो समय है, वह बेशकीमती है। ऐसा न हो कि हम इसको व्यर्थ गवाँ कर पछताएँ। बेहतर तो यह होगा कि हम इसका अधिक से अधिक सदुपयोग करें। ऐसे व्यक्ति को आंतरिक सहायता उसी प्रकार मिलती है, जिस प्रकार आग की सहायता के लिए आक्सीजन आती है।

मुझे खुशी है कि आप औरों की सहायता कर रहें हैं, ताकि वे सत्गुरुओं के रास्ते पर चल सकें। हम नियमित रुप से भजन सिमरन करके और अपने दैनिक आचरण पर कड़ी नज़र रख के, अपनी कम जोरियों पर, विजय पा सकते हैं। आंतरिक शक्ति से

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

हर प्रकार की सहायता मिलती है। जो आध्यात्मिक उन्नति पाने के पक्के इरादे पर डटे रहते हैं, वे अवश्य ही सहायता पाते हैं और समय आने पर अपने लक्ष्य पर पहुँचते हैं। सत्संगों में सत्गुरु की दया भरपूर होती है और कभी-कभी गर्म और सूखे मौसम में भी बारिश होने लगती है, जो कि महान सत्गुरु हजूर बाबा सावनसिंह जी के आशीर्वादों को दर्शाती है।

मुझे आपकी सेहत के बारे में जानकर दुःख हुआ। आपको सलाह दी जाती है कि आप किसी योग्य चिकित्सक से मिलें या कुछ प्राकृतिक किस्म की कसरतें करें, जैसे तेज चलना, नियमित रूप से हल्की-फुल्की कसरत, नियमित समय पर और कम मात्रा में भोजन । जहाँ तक कुंडलिनी का सवाल है, आप इस ओर कोई ध्यान नहीं दें, क्योंकि इसमें बहुत खतरा हैं। आपको एक प्राकृतिक रास्ता बता दिया गया है १

जब सत्गुरु के प्रति प्रेम सभी हदों को पार कर जाता है तो भक्त महसूस करता है कि जैसे वह सत्गुरु से एकमेक हो । तब सत्गुरु उसके द्वारा काम करता प्रतीत होता है और वह सत्गुरु में। क्या सेंट पॉल ने नहीं कहा, यह मैं हूँ, अब मैं नहीं, बल्कि क्राईस्ट मुझ में रहता है। ऐसी अवस्था भजन-सिमरन में सहायता करती है।

शिष्य को पाँच सिद्ध नामों का जाप हर प्रकार के खतरों से बचने के लिए दिया जाता है। यह सभी आध्यात्मिक मंडलों में प्रवेश के लिए संकेत शब्द का काम करता है, मुसीबत के समय मन और शरीर को शक्ति देता है तथा आत्मा को सत्गुरु के नज़दीक लाता । यह एकाग्रता को बढ़ाने का साधन है तथा कई और प्रकार की शक्तियाँ प्रदान करता है। एक सच्चे सत्गुरु द्वारा दिए गए पाँच सिद्ध नाम चार्ज से भरपूर होते हैं ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

ईर्ष्या के विचारों से ऐसी बदबू पैदा होती है जैसे कोई मिर्ची जल रही हो। जिसे आम भाषा में कहते हैं किसी का दिल जल रहा है। जिस व्यक्ति का दिल जलता है उस व्यक्ति को देखते ही अपना मुंह फेर लेते हैं। वहां से भागने को मन करता है। ईर्ष्यालू व्यक्ति सदा निन्दा ही करेगा।

आलस्य से ऐसी तरंगे निकलती हैं जो उसे उदासीन कर देती हैं। किसी भी काम करने को मन नहीं करेगा। हमेशा कहेगा कल करूंगा। उस की तरंगे ऐसी होती हैं कि कोई भी व्यक्ति उसे पसंद नहीं करता सब उस से कन्नी काटने लगते हैं। कोई उसे काम नहीं देता ।

हरेक व्यक्ति को पसीना आता है। जिस व्यक्ति को नाकारात्मक विचार ज्यादा आते हैं उनके पसीने वा कपडो से बहुत गंदी बदबू आती है। श्रेष्ट योगियों के विचार शुद्ध होते हैं उनसे चंदन जैसी खुशबू आती है।

### आज्ञा चक्र

कोई भी हीनता, कोई भी इच्छा पुरी न होने की कसक, धोखे, बेवफाई, पश्चाताप, शारीरिक व मानसिक दुःख, योग न लगने का दुःख, गरीबी का दुख, दुर्व्यवहार का दुख, सम्मान न मिलने का दुख, अनपढ़ होने का दुख, या कोई भी सूक्ष्म में जरा सा भी बुरा महसूस करते हैं तो ये सब नाकारात्मक विचार हैं। जैसे ही नाकारात्मक विचार आते हैं हमारे से बदबू निकलती है। यह ऐसी बदबू है जो नष्ट नहीं होती और पूरे वातावरण में फैल जाती है और जो भी सामने आयेगा प्रभावित होगा। अपने चाहे दूसरे के कारण ज्यों ही सकारात्मक विचार का बीज पैदा हो उसे तुरंत सकारात्मक विचार से बदल दो। जब भी नाकारात्मकता आये तुरंत मन को विश्व सेवा में लगा दो । किसी दूसरी आत्मा को मन से स्नेह वा शांति की तरंगे दो । जिस व्यक्ति से नाकारात्मकता आ रही है उसके पीछे कल्पना में किसी स्नेही आत्मा को देखो और मन ही मन उसे कहो आप स्नेही हो स्नेही हो। आप के यह विचार विरोधी को बदलेगें और आप को भी सकून मिलेगा।

आज्ञा चक्र -३०-मन-

विचार की आकृति/रेखा

हम जो विचार मन में करते हैं वह किसी न किसी आकृति का रुप धारण कर लेता है। एक बार एक महिला अपने बच्चे के लिये रो रही थी जो कि मर चुका था। उस महिला का करीलियन कैमरे से फोटो लिया गया तो उस में उसके बच्चे का फोटो आ गया जिस के लिये वह रो रही थी। एक प्रेमिका अपने प्रेमी की याद में तड़फ रही

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**नवरा :** अगं, माझा गुंता झालाय ग! या योगासनाची पुढची स्टेप काय आहे, बघ लवकर

**बायको :** युट्युब वर 'उद्या भेटू' म्हणुन योगी महाराज निघुन गेले!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारताने वर्ल्ड हॉकी विजेतेपद कधी मिळविले?

- १९७५

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

बुद्धिमत्ता वाढविण्यासाठी पंचेंद्रियांचा विकास, सद्गुणांची संगत, अध्यात्मिक संस्कार, बालकाचा आहार-विहार, आई-वडिलांचे प्रेम, माया, आपुलकीपूर्ण नाते या सर्वच गोष्टींना महत्त्व द्यायला हवे.

आनुवंशिकतेने प्राप्त झालेल्या बुद्धिमत्तेचा पुरेपूर वापर करून त्यांना नवीन ज्ञानाच्या वाटा उपलब्ध करून दिल्या आणि त्याचबरोबर सतत प्रोत्साहन दिले गेले, तर मुलांना त्यांच्या बुद्धिमत्तेच्या सर्वोच्च क्षमतेपर्यंत पोहोचविणे आपल्याला सहज शक्य होते. फक्त हे सर्व करताना त्यांची क्षमता लक्षात घेणे गरजेचे आहे. उगीचच दुसऱ्या मुलाशी तुलना करून आपल्या बाळाचे नुकसान करू नये. त्याच्या कलाकलाने घेऊन आनंदाने कोणतीही बळजबरी न करता आपण मुलांचा बौद्धिक विकास करू शकतो.

खरेतर विकास ही निरंतर प्रक्रिया असून, ती अगदी गर्भावस्थेपासून सुरू होऊन तारुण्यावस्थेपर्यंत सुरू असते. बालकाची शारीरिक वाढ व विकास एकमेकांवर अवलंबून असतो.

### बौद्धिक विकास कसा करावा?

प्रत्येक बालकाचा बौद्धिक विकास हा स्वतंत्रपणे होत असतो. जन्मानंतर शोध आणि ज्ञान ग्रहण करण्याची इच्छा याद्वारेच बौद्धिक विकास होतो. ज्या वातावरणात मुले वाढतात, त्या वातावरणाचाही मुलांच्या बौद्धिक विकासावर परिणाम होतो. पालकांनी मुलांना शिकण्यासाठी नेहमी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. मिळालेले प्रोत्साहन व शिकण्याची संधी याद्वारे मुलांचा सर्वोत्तम बौद्धिक विकास साधता येतो. म्हणून पालकांनी मुलांना सदैव प्रेरित करावे. मुलांच्या बौद्धिक विकासासाठी त्याची शारीरिक वाढही उत्तम होणे गरजेचे आहे. न शारीरिक वाढीबरोबरच मानसिक विकास होत असतो. फास्टफूड टाळून हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, मोड आलेली कडधान्ये, दूध, दुधाचे पदार्थ यांचा वापर आहारात करण्यास प्रत्येक आई-वडिलांनी प्राधान्य द्यावे व मुलांना असा आहार घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. मुलाची बुद्धी कुशाग्र होण्यासाठी त्यांच्या मेंदूला कायम खाद्य पुरवायला हवे. बुद्धीला चालना मिळेल असे शब्दकोडे, बुद्धिबळ, सापशिडी यासारखे बौद्धिक क्षमता वाढविणारे खेळ खेळण्यास उद्युक्त करावे.

अनुवंशिकतेने बालकाला आई-वडिलांकडून काही गुणवैशिष्ट्ये मिळतात, तर काही गुण सभोवतालच्या वातावरणातून आलेल्या अनुभवांमुळे मिळतात. उदा. एकाच घरात जन्मलेल्या दोन्ही मुलांची बौद्धिक क्षमता, स्वभाव हे वेगवेगळे असतात. उदा. दुर्वा आणि अंकुर हे एकाच घरात जन्मलेले सख्खे बहीण-भाऊ. या दोघांचेही स्वभाव, बौद्धिक क्षमता व आवडी-निवडा या वेगवेगळ्या आहेत.

या सर्व गोष्टींबरोबरच आई-वडिलांच्या प्रयत्नाने व आयुर्वेदिक औषधोपचाराने बाळाची बौद्धिक क्षमता वाढण्यास मदत होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# लक्ष्मीपूजन करण्याची पद्धत आणि महत्त्व






आश्विन अमावास्येच्या, म्हणजेच लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्व मंदिरांत, दुकानांत, तसेच घराघरांत श्री लक्ष्मीपूजन केले जाते. आश्विन अमावास्येचा हा दिवस दीपावलीचा एक महत्त्वपूर्ण दिवस मानला जातो. सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; परंतु दीपावलीतील ही अमावस्या शरद पौर्णिमा अर्थात कोजागिरी पौर्णिमेप्रमाणेच कल्याणकारी आणि समृद्धिदर्शक आहे. या दिवशी श्री लक्ष्मीपूजनासोबत अलक्ष्मी नि:सारणही केले जाते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी करावयाच्या कृतीमागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.

**१. इतिहास :**

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले आणि त्यानंतर ते सर्व देव क्षीरसागरात जाऊन झोपले, अशी कथा आहे.

**२. सण साजरा करण्याची पद्धत :**

प्रातःकाळी मंगलस्नान करून देवपूजा, दुपारी पार्वणश्राद्ध अन् ब्राह्मणभोजन आणि प्रदोषकाळी लतापल्लवींनी सुशोभित केलेल्या मंडपात लक्ष्मी, श्रीविष्णु इत्यादी देवता आणि कुबेर यांची पूजा, असा लक्ष्मीपूजन या दिवसाचा विधी आहे.

लक्ष्मीपूजन करतांना एका चौरंगावर अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. काही ठिकाणी कलशावर ताम्हण ठेवून त्यावर लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना करतात. लक्ष्मीजवळच कलशावर कुबेराची प्रतिमा ठेवतात. त्यानंतर लक्ष्मी आदी देवतांना लवंग, वेलची आणि साखर घालून तयार केलेल्या गायीच्या दुधाच्या खव्याचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. मग हातातील चुडीने पितृमार्गदर्शन करतात. ब्राह्मणांना आणि अन्य क्षुधापीडितांना भोजन घालतात. रात्री जागरण करतात.

लक्ष्मीपूजनासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले नाही, तर जेवढे उपलब्ध आहे, त्या साहित्यात भावपूर्णरित्या पूजाविधी करावा. बत्तासे आदी साहित्य न मिळाल्यास, देवाला घरातील तूपसाखर, गूळसाखर किंवा एखादा गोड पदार्थ यांचा नेवैद्य दाखवावा.

**लक्ष्मी कुणाकडे वास करते ?**

आश्विन अमावास्येच्या रात्री जागरण करतात. पुराणांत असे सांगितले आहे की, आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जिथे स्वच्छता, शोभा आणि रसिकता आढळते, तिथे तर ती आकर्षित होतेच; शिवाय ज्या घरात चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त, तसेच क्षमाशील पुरुष आणि गुणवती अन् पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते.

**३. लक्ष्मीपूजनाच्या दिवसाचे महत्त्व :**

सामान्यतः अमावास्या हा अशुभ दिवस म्हणून सांगितला आहे; पण त्याला अपवाद या अमावास्येचा आहे. हा दिवस शुभ मानला आहे; पण तो सर्व कामांना नाही; म्हणून या दिवसाला शुभ म्हणण्यापेक्षा आनंदी दिवस म्हणणे योग्य !

**४. श्री लक्ष्मीदेवीला करावयाची प्रार्थना :**

जमा-खर्चाच्या हिशोबाची वही लक्ष्मीसमोर ठेवायची आणि प्रार्थना करायची, 'हे लक्ष्मी, तुझ्या आशीर्वादाने मिळालेल्या धनाचा उपयोग आम्ही सत्कार्यासाठी आणि ईश्वरी कार्य म्हणून केला आहे. त्याचा ताळमेळ करून तुझ्यासमोर ठेवला आहे. त्याला तुझी संमती असू दे. तुझ्यापासून मी काही लपवून ठेवू शकत नाही. जर मी तुझा विनियोग योग्य प्रकारे केला नाही, तर तू माझ्या जवळून निघून जाशील, याची मी सतत जाणीव ठेवतो. तेव्हा हे लक्ष्मीदेवी, माझ्या खर्चाला संमती देण्यासाठी भगवंताजवळ तू माझी शिफारस कर; कारण तुझ्या शिफारशीशिवाय तो त्याला मान्यता देणार नाही. पुढील वर्षीही आमचे कार्य सुरळीत पार पडू दे.'

**५. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री केर का काढतात ? अलक्ष्मी नि:सारण महत्त्व :**

गुण निर्माण केले तरी दोष नाहीसे झाले, तरच गुणांना महत्त्व येते. येथे लक्ष्मीप्राप्तीचा उपाय झाला, तसेच अलक्ष्मीचा नाशही झाला पाहिजे; म्हणून या दिवशी नवीन केरसुणी विकत घेतात. तिला 'लक्ष्मी' म्हणतात.

**कृती :**

'मध्यरात्री नवीन केरसुणीने घरातील केर सुपात भरून तो बाहेर टाकावा', असे सांगितले आहे. याला 'अलक्ष्मी (कचरा, दारिद्र्य) नि:सारण' म्हणतात. एरव्ही कधीही रात्री घर झाडणे वा केर टाकणे करायचे नसते. फक्त या रात्री ते करायचे असते. कचरा काढतांना सुपे आणि दिमडी वाजवूनही अलक्ष्मीला हाकलून लावतात.

**६. लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक का काढावे ? :**

आश्विन अमावास्येच्या दिवशी केल्या जाणाऱ्या श्री लक्ष्मीपूजनाच्या वेळी अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यांवरच श्री लक्ष्मीची स्थापना केली जाते. सर्व देवतांची पूजा करतांना त्यांना अक्षतांचे आसन दिले जाते. अन्य देवतांच्या तुलनेत श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व अक्षतांमध्ये ५ टक्के जास्त प्रमाणात आकृष्ट होते; कारण अक्षतांत श्री लक्ष्मीच्या प्रत्यक्ष सगुण गुणात्मक, म्हणजेच संपन्नतेच्या लहरी आकृष्ट करण्याची क्षमता असते. अक्षतांमध्ये तारक आणि मारक लहरी ग्रहण करून त्यांचे संचारण करण्याची क्षमता असल्याने लक्ष्मीची पूजा करतांना अक्षतांचे अष्टदल कमल किंवा स्वस्तिक काढावे. स्वस्तिकामध्ये निर्गुण तत्त्व जागृत करण्याची क्षमता असल्याने श्री लक्ष्मीच्या आसनाच्या स्वरूपात स्वस्तिक काढावे.

**७. लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणण्याचे कारण**

एखाद्या देवतेची उपासना केली की, त्या देवतेचे तत्त्व उपासकाकडे येते आणि त्यानुसार लक्षणे दिसतात, उदा. श्री लक्ष्मीची उपासना केली की, धनप्राप्ती होते. उपासना कमी झाली, अहं जागृत झाला की, देवतेचे तत्त्व उपासकाला सोडून जाते. अशाच कारणांमुळे श्री लक्ष्मी उपासकाला सोडून जाते. तेव्हा स्वतःची चूक मान्य न करता व्यक्ती म्हणते, लक्ष्मी चंचल आहे. येथे लक्षात घेण्यासारखे सूत्र हे की, लक्ष्मी चंचल असती, तर तिने श्रीविष्णूचे चरण केव्हाच सोडून दिले असते

**- परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले**

**संदर्भ :** सनातन संस्थेचे ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

**संकलन- परमेश्वर गायकवाड**

# बलीप्रतिपदा (दिवाळी पाडवा)






अत्यंत दानशूर, परंतु दान कोणाला द्यावे याची जाण नसलेल्या बलीराजाला भगवान श्रीविष्णूने वामनावतार घेऊन पाताळात धाडल्याचा हा दिवस. त्रिपाद भूमी दान मागून वामनाने बलीराजाला जरी पाताळात धाडले असले, तरी सर्वार्थाने त्याचे कल्याणच केले आहे. पृथ्वीतलावर दीपावली साजरी केली जाण्यामागे देखील या घटनेचा प्रमुख आधार आहे. बलिप्रतिपदा सणाविषयीचे शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून जाणून घेऊया.

**१. तिथी :**

**कार्तिक शुद्ध प्रतिपदा (दिवाळी पाडवा).**

श्रीविष्णूने ही तिथी बलीराजाच्या नावाने केली, म्हणून या तिथीला 'बलीप्रतिपदा' म्हटले जाते.

**२. इतिहास :**

बलीराजा हा अत्यंत दानशूर होता. दारी येणारा अतिथी जे मागेल ते दान तो त्याला देत असे. 'दान देणे' हा गुण आहे; पण गुणांचा अतिरेक हा दोषार्हच असतो. कोणाला काय, केव्हा आणि कोठे द्यावे याचा निश्चित विचार आहे अन् तो शास्त्रात आणि गीतेत सांगितला आहे. सत्पात्री दान द्यावे. अपात्री देऊ नये. अपात्र माणसांच्या हाती संपत्ती गेल्याने ते मदोन्मत्त होऊन वाटेल तसे वागू लागतात. बलीराजा कोणालाही केव्हाही जे मागेल ते देत असे. तेव्हा भगवान श्री विष्णूने मुंजा मुलाचा अवतार (वामनावतार) घेतला. (मुंजा मुलगा लहान असतो अन् तो 'ॐ भवति भिक्षां देही ।' म्हणजे 'भिक्षा द्या' असे म्हणतो.) वामनाने बलीराजाकडे जाऊन भिक्षा मागितल्यावर त्याने विचारले, ''काय हवे ?'' तेव्हा वामनाने त्रिपाद भूमीदान मागितले. 'वामन कोण आहे आणि या दानामुळे काय होणार', याचे ज्ञान नसल्याने बलीराजाने त्रिपाद भूमी वामनाला दान दिली. त्याबरोबर वामनाने विराटरूप धारण करून एका पायाने सर्व पृथ्वी व्यापून टाकली. दुसऱ्या पायाने अंतरिक्ष व्यापले अन् त्याने ''तिसरा पाय कोठे ठेवू ?'', असे बलीराजास विचारले. त्यावर बलीराजा म्हणाला, ''तिसरा पाय माझ्या मस्तकावर ठेवा.'' तेव्हा 'तिसरा पाय त्याच्या मस्तकावर ठेवून बलीराजाला पाताळात घालावयाचे' असे ठरवून वामनाने, ''तुला काही वर मागावयाचा असेल तर माग (वरं ब्रूहि)'', असे त्याला सांगितले. तेव्हा त्याने वर मागितला, 'आता पृथ्वीवरील माझे सर्व राज्य संपणार आहे आणि आपण मला पाताळात घालविणार आहात, तेव्हा तीन पावले टाकण्याचे जे सर्व घडले, ते पृथ्वीवर प्रतिवर्षी तीन दिवस तरी माझे राज्य म्हणून ओळखले जावे. प्रभू, यमाप्रीत्यर्थ दीपदान करणाऱ्याला यमयातना होऊ नयेत, त्याला अपमृत्यू येऊ नये आणि त्याच्या घरी लक्ष्मीने निरंतर वास करावा.' ते तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा. याला 'बलीराज्य' असे म्हणतात.

**३. महत्त्व :**

दिवाळी पाडवा साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त आहे. हा 'विक्रम संवत' कालगणनेचा वर्षारंभदिन म्हणून साजरा करतात.

**४. सण साजरा करण्याची पद्धत :**

या दिवशी बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन करून त्याला नैवेद्य दाखवला जातो; म्हणजेच त्याच्या क्षुधा-तृष्णा शांत केल्या जातात. बलीप्रतिपदेच्या दिवशी जमिनीवर पंचरंगी रांगोळीने बली आणि त्याची पत्नी विंध्यावली यांची चित्रे काढून त्यांची पूजा करतात. यानंतर बलीप्रीत्यर्थ दीप अन् वस्त्रे यांचे दान करतात. या दिवशी प्रातःकाळी अभ्यंगस्नान केल्यावर स्त्रिया पतीला ओवाळतात. दुपारी ब्राह्मणभोजन घालतात. या दिवशी पक्वान्नांचे भोजन करतात.

**पाडव्याला पतीला ओवाळण्यामागील आध्यात्मिक महत्त्व काय ? -**

या दिवशी प्रातःकाळी अभ्यंगस्नान केल्यावर स्त्रिया पतीला ओवाळतात. पुरुष हे शिवाचे आणि स्त्री हे दुर्गादेवीचे प्रतीक आहे. ओवळल्यामुळे पत्नीमध्ये दुर्गातत्त्व कार्यान्वित होते आणि पतीचे औक्षण केल्यानंतर त्याची कुंडलिनीशक्ती जागृत होऊन त्याच्यातील सुप्तावस्थेत असणारे शिवतत्त्व प्रकट होते.

बलीराज्यात शास्त्राने सांगितलेली निषिद्ध कर्मे सोडून आपल्या मनाला वाटेल तसे लोकांनी वागावे', असे धर्मशास्त्र सांगते. अभक्ष्यभक्षण, अपेयपान आणि अगम्यागमन ही निषिद्ध कर्मे आहेत; म्हणून या दिवसांत माणसे दारू उडवितात (आतषबाजी करतात); पण दारू पीत नाहीत ! शास्त्राने परवानगी दिली असल्याने परंपरेने लोक या दिवसांत मौजमजा करतात.

या दिवशी लोक नवी वस्त्रावरणे लेवून सर्व दिवस आनंदात घालवितात. या दिवशी गोवर्धनपूजा करण्याची प्रथा आहे. त्यासाठी शेणाचा पर्वत करून त्यावर दूर्वा आणि फुले खोचतात. श्रीकृष्ण, इंद्र, गायी अन् वासरे यांची चित्रे शेजारी मांडून त्यांचीही पूजा करतात आणि मिरवणूक काढतात.

**५. ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा करत देवत्वाला पोहोचलेल्या बलीची आठवण करावी ! :**

'बलीप्रतिपदेला बळीची पूजा करतात. बळीने राक्षस कुळात जन्म घेऊनही त्याच्या पुण्याईने त्याच्यावर वामनदेवाची कृपा झाली. त्याने ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा केली. तो सात्त्विक वृत्तीचा आणि दानी राजा होता. प्रत्येक मानव हा सुरुवातीला अज्ञानी असल्यामुळे त्याच्या हातून वाईट कृत्य घडत असते; परंतु ज्ञान आणि ईश्वरी कृपा यांमुळे तो देवत्वाला पोहोचू शकतो, हे या उदाहरणावरून दिसून येते. अशा निर्भयतेने सत्यकर्माचे पालन केल्यावर त्याला मृत्यूभयच रहात नाही. यमसुद्धा त्याचा मित्र व बंधू होतो. या दिवशी भगवंताने वामन अवतारात दाखवून दिले की, भगवंत हा सर्वस्व अर्पण करणाऱ्याचा दाससुद्धा होण्याची तयारी ठेवतो. बली वास्तविक असुर घराण्यातील असूनसुद्धा त्याच्या उदार तत्त्वामुळे अन् त्याने भगवंताला शरण जाऊन आपले सर्वस्व अर्पण केल्यामुळे भगवंताने त्याला योग्य मार्गदर्शन करून त्याच्या जीवनाला कलाटणी दिली आणि त्याचा उद्धार केला. त्याच्या राज्यात असलेले असुरवृत्तीला पोषक असे भोगमय विचार घालवून, त्या ठिकाणी त्यागाची भावना रुजवून, जनतेला दैवीविचार देऊन सुख आणि समृद्धी यांचे जीवन प्रदान केले.'

**- परात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज**

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- परमेश्वर गायकवाड**

दिवाळी ऑफर





दिवाळीत मुलीला, पत्नीला भारी ड्रेस घ्यायचाय... भाऊबिजेला बहिण भाची येणार यांना भारी ड्रेस घ्यायचाय...लग्नसमारंभात, कार्यक्रमात घालण्यासाठी स्व:ताला भारी ड्रेस पाहिजे आणि तेही कमीत कमी किंमतीत ... तर मग चला फक्त आणि फक्त मयुरी लेडिज मॉल मध्ये..भरपूर व्हरायटी आणि तेही ऑनलाईन व होलसेल पेक्षा कमी किंमतीत...

लहान मुलींपासून ते मोठ्या मुलींपर्यंत व महिलासाठी साईज १६ ते ४२ व पुढे ब्रँडेड व हायक्वॉलीटी मध्ये - फ्रॉक, शरारा-गरारा, नायरा पॅटर्न, जॅकेट पॅटर्न, वन पिस, टू पिस, थ्री पीस, घागरा, स्कर्ट टॉप पॅटर्न, पार्टीवेअर ड्रेस

सर्वांसाठी स्वेटर्स व जर्किन्स् मर्यादित स्टॉक

* मोठ्या मुलींचे रु. ३०००/- ते रु. ४०००/- पर्यंतचे ड्रेस फक्त रु. ५००/- ते रु. १०००/- पर्यंत
* महिलांचे रु. ३०००/- ते रु. ४०००/- पर्यंतचे ड्रेस फक्त रु. १५००/- ला एक व रु.२०००/- ला दोन
* लहान मुलींचे रु.१५००/- ते रु.२०००/- पर्यंतचे फ्रॉक व ड्रेस फक्त रु. ३५०/- ते रु. ७००/- पर्यंत

रु.१०००/- पेक्षा जास्त रक्कमेची खरेदी करा व लकी ड्रॉ कुपन भरुण मिळवा आकर्षक बक्षिसे

लहान मुलांचा बाबासुट रु.१५००/-चा फक्त रु.५५०/-मध्ये

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल

मयुरी लेडिज मॉल

वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

# भाऊबीज (यमद्वितीया)




या दिवशी मृत्यूची देवता यम आपल्या बहिणीकडे जेवायला जात असल्याने नरकातील जिवांना या दिवशी नरकयातना भोगाव्या लागत नाही, असे म्हटले जाते. तसेच या दिवशी बहीण भावाला ओवाळून त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. पुराणकाळापासून चालत आलेल्या या सणाबाबतची शास्त्रीय माहिती या लेखाच्या माध्यमातून करून घेऊया.

**१. तिथी :** कार्तिक शुद्ध द्वितीया

**२. इतिहास :** या दिवशी यम आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला गेला; म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असे नाव मिळाले.

**३. महत्त्व :** अपमृत्यू येऊ नये म्हणून धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी आणि यमद्वितीया या दिवशी मृत्यूची देवता 'यमधर्म' हिचे पूजन करतात.

'या दिवशी यमराज आपली बहीण यमुना हिच्या घरी जेवायला जातो अन् त्या दिवशी नरकात पिचत पडलेल्या जिवांना त्या दिवसापुरते मोकळे करतो.'

हा दिवस मातेच्या गर्भातून जन्म घेतलेल्या जिवांना एकमेकांविषयी वाटणारा जिव्हाळा व्यक्त करण्याचा दिवस आहे.

या दिवशी जी बहीण आपल्या भावासाठी श्री यमाईदेवीकडे काही मागणे मागते, तिच्या भावानुसार ते भावाला मिळते. त्यामुळे तिचे भावाशी असलेले देवाण-घेवाण हिशोब काही प्रमाणात संपुष्टात येतात.

**४. सण साजरा करण्याची पद्धत -** यमतर्पण, यमदीपदान आणि यमाची प्रार्थना करणे - अपमृत्यू निवारणार्थ 'श्री यमधर्मप्रीत्यर्थं यमतर्पणं करिष्ये ।' असा संकल्प करून यमाच्या चौदा नावांनी तर्पण करावे. हा विधी पंचांगात दिलेला असतो. 'याच दिवशी यमाला दीपदान करायचे असते. यम ही मृत्यू आणि धर्म यांची देवता आहे. 'प्रत्येक माणसाला मरण आहे', ही जाणीव सतत असणे आवश्यक आहे; कारण त्यामुळे माणसाच्या हातून वाईट कार्य वा धनाचा अपव्यय होणार नाही. तेव्हा यमाला दीपदान करून सांगायचे, 'हे यमा, या दीपाप्रमाणे आम्ही सतर्क आहोत, जागरूक आहोत. जागरूकतेचे, प्रकाशाचे प्रतीक असलेला दीप तुला अर्पण करीत आहोत, त्याचा स्वीकार कर. तुझे आगमन केव्हा होईल, हे आम्हाला माहीत नाही; म्हणून आम्ही आमचा हिशोब वेळच्या वेळी ठेवतो, ज्यामुळे अर्धवट राहिलेल्याची चिंता करण्याची वेळ येत नाही; कारण आम्हाला माहीत आहे की, तू अचानक कधीही येऊ शकतोस.' **- परात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज**

**बहिणीने भावाला ओवाळणे -**


या दिवशी भावाने बहिणीकडे जावे आणि बहिणीने भावाला ओवाळावे. एखाद्या स्त्रीला भाऊ नसेल, तर तिने कोणाही परपुरुषाला भाऊ मानून त्याला ओवाळावे. ते शक्य नसल्यास चंद्राला भाऊ मानून ओवाळावे. ऱ्या दिवशी कोणत्याही पुरुषाने स्वतःच्या घरी पत्नीच्या हातचे अन्न घ्यायचे नसते. त्याने बहिणीच्या घरी जावे अन् तिला वस्त्रालंकार वगैरे देऊन तिच्या घरी भोजन करावे. सख्खी बहीण नसेल, तर कोणत्याही बहिणीकडे किंवा अन्य कोणत्याही स्त्रीला भगिनी मानून तिच्याकडे जेवावे.'

**५. भाऊबीजेला भगिनींना स्वसंरक्षणार्थ समर्थ करूया !**

'कित्येक भगिनींवर आज बलात्कार होतो, कित्येकींचे संसार उद्ध्वस्त होतात. एकतर्फी प्रेमातून कित्येकींची उघड उघड हत्याही होते. समाजाच्या प्रेतवत्, म्हणजे क्षात्रधर्महीन मानसिकतेचे हे प्रतीक आहे. स्वतःमध्ये क्षात्रतेज जागवून शारीरिक अन् मानसिक दृष्ट्या सबळ होऊन आपण आपल्या भगिनींचे रक्षण केले पाहिजे. याचबरोबर भगिनींनाही स्वसंरक्षणार्थ सिद्ध होण्यासाठी प्रोत्साहित आणि प्रशिक्षित करणे गरजेचे आहे. हीच त्यांच्यासाठी भाऊबीजेची खरी भेट ठरेल. दीपावलीच्या निमित्ताने समाज, राष्ट्र अन् धर्म यांसाठी काहीतरी करण्यासाठी यथाशक्ती पाऊल उचलले, तरच हा सण खऱ्या अर्थाने साजरा होईल.'

**संदर्भ :** सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

संकलन - **परमेश्वर गायकवाड**



डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल

बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

# एचआयव्ही बाधितांसाठी दिवाळी फराळ वाटप कार्यक्रम

नगर - एन. ए.डी. पी.+ संस्था, अहमदनगर (नेटवर्क ऑफ अहमदनगर डिस्ट्रिक्ट बाय पीपल लिविंग विथ एच आय व्ही/ एड्स) तर्फे एचआयव्ही बाधित नागरिकांसाठी दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. सुनील कटारिया व सचिव रो. अमर गुरप, जिल्हा रुग्णालयचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी शिवाजी जाधव हे होते. एन. ए.डी. पी.+ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व जिल्हा एड्स नियंत्रण समिती सदस्य प्रशांत येंडे उपस्थित होते. कार्यक्रमात फराळातील लाडू, चिवडा, करंजी, चकली, अनारसे यांचे वाटप करण्यात आले.



एन. ए.डी. पी.+ संस्था, अहमदनगर (नेटवर्क ऑफ अहमदनगर डिस्ट्रिक्ट बाय पीपल लिविंग विथ एच आय व्ही/ एड्स) तर्फे एचआयव्ही बाधित नागरिकांसाठी दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमप्रसंगी बोलताना रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष रो. सुनील कटारिया. (छाया - उदय जोशी)

सुनील कटारिया म्हणाले एचआयव्ही बाधित बांधव हे आपल्या समाजाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे हीच खरी दिवाळी आहे. या कार्यातून समाजात सहानुभूती व संवेदनशीलतेचा दीप प्रज्वलित होत आहे. एन. ए.डी. पी.+ संस्था समाजात मानवतेचा व सहानुभूतीचा दीप लावत आहे. अशा कार्याचे कौतुक करावे तितके थोडे आहे.

प्रशांत येंडे म्हणाले, एन. ए. डी. पी + संस्था नेहमीच समाजातील वंचित घटकांसाठी कार्यरत असते. दर वर्षी आम्ही एचआयव्ही बाधित नागरिकांसोबत फराळ वाटून दिवाळी साजरी करत आहोत, हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे.

सूत्रसंचालन दत्तात्रय काळे यांनी केले. कार्यक्रमास प्रकल्प समन्वयक वैष्णवी गवई, दत्तात्रय काळे, जयश्री शिंदे, कल्पना कुमटेकर, संगीता दराडे, कल्पना पाथरकर, माधवी पुंड, अर्चना धोत्रे, सुमन गवारी, मनीषा बडदे, ओमकार पुंड, मंगला जिरेकर, सविता साबळे, सपना बजाज, तब्बसूम शेख, अनिल गावडे, स्वयंसेवक, लाभार्थी व एन. ए. डी. पी.+ संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
CERTIFICATE COURSE IN ADVANCE
ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac+ Students Trained | Job Assistance
100% JOB ASSISTANCE
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE

# जेएसएस गुरुकुलच्या विद्यार्थ्यांची उपेक्षित मुलांसह दिवाळी साजरी

## बालगृहातील मुलांना फराळ, कपडे, अन्नधान्य व किराणा साहित्याची दिवाळी भेट



जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जे.एस.एस.) च्या विद्यार्थ्यांनी उपेक्षित व अनाथ मुलांसह दिवाळी साजरी करून समाजात एक सकारात्मक संदेश दिला.

नगर – केडगाव येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जे.एस.एस.) च्या विद्यार्थ्यांनी उपेक्षित व अनाथ मुलांसह दिवाळी साजरी करून समाजात एक सकारात्मक संदेश दिला.

गुरुकुलच्या मैदानात आयोजित दिवाळी सेलिब्रेशन कार्यक्रमात तपोवन रोडवरील बालगृह प्रकल्पातील मुलांना सहभागी करून घेण्यात आले. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी या बालमित्रांना दिवाळी भेटवस्तू, फराळ, कपडे, अन्नधान्य व किराणा साहित्य देऊन सणाचा आनंद द्विगुणित केला.

शाळेचे प्राचार्य आनंद कटारिया व प्राचार्या निकिता कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निखिल बेद्रे, अक्षय नायडू, वैशाली देशमुख, हर्षा कार्ले, बिना आरवडे, अनुपमा तोडमल, योगिता पाठक आदी शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी घरुन आणलेला फराळ आणि भेटवस्तू बालगृहातील मुलांना दिल्या. त्या भेटी स्वीकारताना बालगृहातील मुलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. शाळांतील व बालगृहातील विद्यार्थ्यांनी एकत्र खेळ, गाणी, नृत्य व विविध खेळांच्या माध्यमातून सण साजरा केला.

प्राचार्य आनंद कटारिया म्हणाले की, आजच्या पिढीने फक्त सण साजरा करणे नव्हे, तर समाजातील दुर्बल घटकांपर्यंत आनंद पोहोचविणे हेही आपले कर्तव्य आहे. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देण्याची भावना, सहानुभूती व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होते. फटाके फोडून आनंद घेण्यापेक्षा, त्या पैश्यातून वंचितांच्या जीवनात आनंद निर्माण करणारी दिवाळी साजरी व्हावी. या उद्देशाने हा उपक्रम राबविल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्राचार्या निकिता कटारिया म्हणाल्या की, शिक्षण फक्त पुस्तकी मर्यादेत राहू नये. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष जीवनातील मूल्ये आत्मसात केली पाहिजेत. उपेक्षित मुलांबरोबर दिवाळी साजरी केल्याने त्यांच्यात संवेदनशीलता, समजूतदारपणा आणि सामूहिकतेची जाणीव निर्माण होते. हेच आमच्या शाळेच्या संस्कारशिक्षणाचे ध्येय असल्याचे ते म्हणाल्या. या उपक्रमामुळे दिवाळीचा उत्सव हा केवळ रोषणाई आणि मिठाईपुरता मर्यादित न राहता, समाजातील प्रत्येक घटकाला आनंद देणारा सण ठरला.

या उपक्रमासाठी समस्त हिंदू बांधव संघटनेच्या जिल्हाध्यक्षा ज्योती वाघस्कर, जिल्हा उपाध्यक्ष शितल दळवी, रुक्मिणी ठोंबरे यांचे सहकार्य लाभले.

या उपक्रमाबद्दल बालगृह प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड यांनी आभार मानले.





जलशुद्धीकरण शाळेत पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करण्यात आली.

# जलशुद्धीकरण शाळेत पर्यावरण पूरक दिवाळी साजरी

नगर – जलशुद्धीकरण शाळेत प्रथम सत्राच्या समारोपाच्या दिवशी पर्यावरणपूरक दिवाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनवलेल्या आकाशकंदीलांनी, रंगीबेरंगी पणत्यांनी आणि चॉकलेटच्या कागदांपासून तयार केलेल्या तोरणांनी शाळेची सजावट करण्यात आली होती. विद्यार्थिनींनी स्वतः सुंदर रांगोळ्या काढून परिसर अधिकच आकर्षक केला.

या विशेष उपक्रमात विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत मोठ्या आवाजाचे फटाके न वाजवण्याचे आवाहन करण्यात आले. त्याऐवजी पर्यावरणपूरक उपक्रम पूर्ण करून दिवाळी आनंदाने साजरी करण्यास सांगण्यात आले. 'एक पेड मा के नाम' या उपक्रमांतर्गत लावलेल्या झाडांची देखील काळजी घेण्याचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागृती, निसर्गसंवर्धन आणि सामाजिक बांधिलकी यांची भावना निर्माण होण्यास मदत झाली. याशिवाय, गरजूंना व वंचितांना मदत करून त्यांची दिवाळीही आनंददायी करण्याचे आवाहन करण्यात आले. सुट्टीच्या काळात विद्यार्थ्यांनी चांगली पुस्तके वाचून आपले ज्ञान वाढवावे, अशी सूचना शिक्षकांनी दिली.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. दुर्गा हिरणवाळे, शिक्षक संजय बोरुडे, अर्चना बोरुडे तसेच अनेक माता–पालक उपस्थित होते.



बालघर प्रकल्प येथे 'नगर जल्लोष (ट्रस्ट) व हॉटेल ब्रम्हा भोज'तर्फे दिवाळी कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# बालघर प्रकल्प येथे दिवाळीनिमित्त नगर जल्लोष आणि ब्रम्ह भोजतर्फे फराळ

नगर – तपोवन रोडवरील बालघर प्रकल्प येथे दिवाळीचा आनंद द्विगुणित करणारा उपक्रम नगर जल्लोष (ट्रस्ट) आणि हॉटेल ब्रम्हा भोज यांच्या वतीने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात सर्व मुलांना दिवाळीचा फराळ, फटाके व भेटवस्तू देण्यात आल्या. याचे वितरण संजय शिंगवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष गुंजन शिंगवी, लौकिक शिंगवी, सल्लागार समिती प्रमुख सुहासभाई मुळे, ट्रस्टचे अध्यक्ष सागर बोगा, खजिनदार दिपक गुंडू, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक नारायण मंगलाराम, ओंकार मुनगेल, गिरीश मुदिगंटी, सौ.पल्लवी बोगा व सौ.ऐश्वर्या मुदिगंटी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दिव्यांच्या उजेडात बालघर प्रकल्पा कडून युवराज गुंड यांच्या प्रस्तविकाने करण्यात आली. बालकांनी 'आमची दिवाळी' अंतर्गत पुष्पगुच्छ देऊन उपस्थितांचे स्वागत केले.

प्रमुख पाहुणे संजय शिंगवी यांनी या वेळी मुलांना शुभेच्छा देत सांगितले, समाजातील प्रत्येक घटकाने या लहानग्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्यासाठी एक पाऊल उचलले, तर खरी दिवाळी सर्वांसाठी उजळेल.

गुंजन शिंगवी यांनी सांगितले की, दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे प्रकाश देणे – आणि तोच प्रकाश आज या बालकांच्या आयुष्यात आणण्याचा आमचा लहानसा प्रयत्न आहे.

बालघरातील गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या गीतांनी कार्यक्रम अधिक रंगतदार झाला. कार्यक्रमाच्या शेवटी बालकांसोबत फराळाचा आस्वाद घेत एकत्र दिवाळी साजरी केली.

# शेवटच्या घटकांपर्यंत दिवाळीचा प्रकाश पोहोचला पाहिजे

## प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे यांचे प्रतिपादन; शेतकऱ्यांच्या वेदना विसरू नका, न्यायाधीश आणि वकिलांच्या दिवाळी फराळात सामाजिक संदेश



अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालयात न्यायाधीश व वकीलांसाठी आयोजित दिवाळी फराळ कार्यक्रमात प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे आदी.

नगर – दरवर्षी आपण दिवाळी साजरी करतो, पण खऱ्या अर्थाने दिवाळी तेव्हाच उजळते जेव्हा समाजातील शेवटच्या घटकांनाही त्या प्रकाशाचा आनंद घेता येतो. यंदाच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आपण आपला आनंद साजरा करत असताना त्यांचाही सण गोड व्हावा, यासाठी प्रत्येकाने काहीतरी हातभार लावला पाहिजे, असा हृदयस्पर्शी संदेश प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे यांनी दिला.

अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालयात न्यायाधीश व वकीलांसाठी आयोजित दिवाळी फराळ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्रधान जिल्हा न्यायाधीश अंजू शेंडे बोलत होत्या. याप्रसंगी जिल्हा न्यायाधीश पाटील, सरकारी वकील सतीश पाटील, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, उपाध्यक्ष ॲड. वैभव आघाव, सचिव ॲड. संदिप बुरके, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. अनुराधा येवले, कार्यकारिणी सदस्य ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. अभिजीत देशमुख, ॲड.संजय पाटील, सरकारी वकील ॲड. जी.के. मुसळे, ॲड. रविंद्र शितोळे, ॲड. गौरव दांगट, ॲड. राजेश कावरे, ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. रमेश कराळे, ॲड. अजिंक्य काळे, ॲड. अनिता दिघे, ॲड. स्वाती जाधव, ॲड.बी.ए. देशमुख, ॲड. आनंद सुर्यवंशी, ॲड. प्रज्ञा ऊजागरे, ॲड. पिंटू पाटोळे, ॲड. स्नेहा लोखंडे, ॲड. ज्योत्सना ससाणे आदी उपस्थित होते.

न्यायाधीश अंजू शेंडे पुढे म्हणाल्या की, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी न्यायाधीशांनी एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिला आहे. समाजातील सर्व घटकांनी आपल्या परीने मदतीचा हात पुढे करावा. याप्रसंगी त्यांनी समाजजागृतीपर ऊन सावळी येतील... लावू चार दिवे लावू... जिथे माहित नाही दिवाळी तेथे लावू चौथा दिवा... ही भावपूर्ण कविता सादर केली.

प्रास्ताविकात बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे यांनी सांगितले की, दरवर्षी बेंच आणि बार यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी दिवाळी फराळाचे आयोजन केले जाते. न्यायव्यवस्था गतीमान ठेवण्यासाठी दोन्ही घटक एकमेकांवर अवलंबून आहेत. अशा खेळीमेळीच्या वातावरणात विचारांची देवाणघेवाण होऊन आपुलकी वृद्धिंगत होत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव आघाव यांनी केले. संदिप बुरके यांनी आभार मानले.

या आनंदोत्सवात उपस्थित सर्वांनी एकमेकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.






## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना दिवाळीनिमित्त भेटवस्तू

प्रभाग ११ मधील बाजारपेठ मधील अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना भाजपा माजी सरचिटणीस प्रशांत मुथ्था व शिवमित्र प्रतिष्ठानच्या वतीने दिवाळीच्या भेटवस्तू वाटप करण्यात आले. प्रशांत मुथ्था, महेश गुगळे, नीरज राठोड, अनिल सबलोक, प्रशांत डहाळे, आनंद कटारिया, प्रमोद गांधी, विजय कोठारी, विश्वास वाघ, निखिल नहार, प्रकाश मुथा चेतन कांकरिया, आनंद कांकरिया, संकेत गुरव, अनमोल कांकरिया, सागर गुरव, आदीत्य आनेचा, पियुष संचेती दर्शन, मुथा विजय गांधी, यश मुथा आदी उपस्थित होते. (छाया – उदय जोशी)







# स्नेहालयच्या 'उमेद प्रकल्पा'तर्फे आय–कार्ड व साडी वाटप सोहळा

## घरेलू कामगार महिलांच्या सशक्तीकरणाचा नवा अध्याय



स्नेहालय संस्थेच्या 'उमेद प्रकल्पा'तर्फे आयोजित घरेलू कामगार महिलांच्या आय–कार्ड वितरण व दिवाळी निमित्ताने माहेरची साडी वाटप करण्यात आले.

नगर – स्नेहालय संस्थेच्या 'उमेद प्रकल्पा'तर्फे आयोजित घरेलू कामगार महिलांच्या आय–कार्ड वितरण व दिवाळी निमित्ताने माहेरची साडी वाटप करण्यात आले. सोहळा रहेमत सुलतान फाउंडेशन, अहिल्यानगर येथे झाला. या उपक्रमाद्वारे सेवावस्तीतील १०८ एकल, विधवा, घटस्फोटित व गरजू महिलांना महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार कल्याण मंडळाचे योजना अंतर्गत घरेलू कामगार ओळखपत्र तसेच दिवाळी निमित्त माहेरची साडी देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला स्नेहालयच्या सचिव डॉ. प्रीती भोंबे, विश्वस्त राजीव गुजर, बालभवन मानद संचालिका वैशाली चोपडा व संचालक हनीफ शेख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना डॉ. प्रीती भोंबे म्हणाल्या, घरेलू कामगार कार्ड हे केवळ एक ओळखपत्र नाही, तर महिलांच्या अधिकारांचे आणि आत्मसन्मानाचे प्रतीक आहे. घरगुती कामगार हा असंघटित कामगार वर्ग असून त्यांना सामाजिक सुरक्षा कल्याणकारी योजना व अधिकाऱ्यांची संरक्षण देणे, या माध्यमातून महिलांना अन्याय आणि अत्याचारांविरुद्ध उभं राहण्याची ताकद मिळते.

राजीवगुजरयांनीयाशासनाच्यायोजनेतूनसामाजिकसुरक्षावविमा योजना, शिक्षण सहाय्यता योजना, विवाह सहाय्यता योजना, प्रशिक्षण व सक्षमीकरण आणि घरगुती कामगारांचे हक्काचे संरक्षण मिळणार आहे असे नमूद करून महिलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत आत्मनिर्भरतेचा संदेश दिला. हनीफ शेख यांनी स्नेहालयच्या सक्षमा प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या बेडसाईट नर्सिंग, बाळंतीण आया व स्वच्छता कौशल्य प्रशिक्षणाबाबत माहिती देवून या प्रशिक्षणाचा फायदा आता या कष्टकरी महिलांनी घेऊन हे तांत्रिक शिक्षण प्रशिक्षण द्वारे आपल्या उपजीविकेत आर्थिक भर वाढवावी याबाबत मार्गदर्शन केले.

सखी सेंटरच्या समन्वयक शबाना शेख यांनी महिला व बालविकास विभागाच्या विविध सरकारी योजनांची माहिती देत महिलांना सक्रिय सहभागाचे आवाहन केले.

### उमेद प्रकल्प – महिलांच्या सशक्तीकरणासाठी नवा दीपस्तंभ

स्नेहालयचा 'उमेद प्रकल्प' हा सामाजिक न्याय व स्वावलंबनासाठी झटणारा उपक्रम असून एकल, विधवा, घटस्फोटित, निराधार व वंचित महिलांना आर्थिक स्थैर्य व आत्मसन्मान मिळवून देण्याचे ध्येय त्यामागे आहे. मागील दहा महिन्यांत या प्रकल्पांतर्गत – ३०० गरजू महिलांचे सर्वेक्षण पूर्ण केले, १२५ महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले, गोधडी उद्योग सुरू करून घरबसल्या रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली, ५७ महिलांची बँक खाती उघडली, २४३ घरेलू कामगारांचे फॉर्म कामगार विभागाकडे सादर करण्यात आले, त्यापैकी ७६ कार्ड वाटप आज करण्यात आले.

### महिलांसाठी दिवाळीची माहेरची भेट

या सोहळ्याचा समारोप करताना आयोजकांनी सांगितले की, हा आय–कार्ड वितरण सोहळा केवळ दस्तऐवजांचा कार्यक्रम नाही, तर सशक्तीकरणाचा उत्सव आहे. अहिल्यानगर शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये स्नेहालय संचलित बालभवन प्रकल्पांद्वारे कष्टकरी महिलांसोबत रोजगार आणि आर्थिक उन्नतीसाठी 'उमेद प्रकल्प' कार्यरत आहे. जिल्हा कामगार कार्यालयाच्या सहकार्याने या महिलांना घरेलू कामगार कार्ड देत दिवाळीच्या निमित्ताने माहेरची साडी देणे हा एक भावनिक सन्मानाचा क्षण ठरला आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यास्मिन शेख यांनी केले. सूत्रसंचालन प्रतीक्षा साळवे यांनी केले. रुबीना शेख यांनी आभार मानले.

या उपक्रमाच्या आयोजनासाठी, कामगार अधिकारी संदीप पालवे, बाल भवन व्यवस्थापक उषा खोल्लम, राजू पांढरे, निलोफर शेख, संतोष बेदरकर, सचिन वाघ व बालभवन टीम यांनी परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अर्थजगत

# आर्थिक ध्येय गाठण्यासाठी

**प्रत्येक व्यक्ती हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रचंड मेहनत करत असतो. असे असतानाही ठराविक मंडळीच श्रीमंत होतात. यामागे प्रमुख कारण म्हणजे बहुतांश मंडळी गुंतवणुकीच्या मुलभूत गोष्टीं जाणून घेत नाहीत. केवळ गुंतवणूक केल्यानेच एखादा व्यक्ती श्रीमंत होतो, असे नाही. यासाठी उत्पन्नाबरोबरच योग्य योजना आखून त्यादृष्टीने गुंतवणूक करणे क्रमप्राप्त ठरते. अशा कृतीतून आपण आर्थिक ध्येय सहजपणे गाठू शकतो.**

**तीस टक्के बचत :** प्रत्येक व्यक्तीने मासिक उत्पन्नाच्या किमान ३० टक्के बचत करायला हवी. जर आपण नोकरी किंवा व्यवसाय करत असाल तर भविष्य निर्वाह निधी किंवा टीडीएस कपातीनंतर जो काही पैसा मिळतो, ते शुद्ध वेतन मानायला हवे. जर आपले मासिक उत्पन्न ५० हजार असेल तर कर आणि पीएफ कपातीनंतर आपले घरगुती वेतन हे ४० हजार रुपये गृहित धरले जाईल. या प्रमाणे आपण किमान १२ हजार रुपये दरमहा बचत करायला हवी.

**खात्यात किती रक्कम हवी :** जर आपल्या घराचे बजेट ३० हजार दरमहा असेल तर खात्यात ९० हजारापेक्षा अधिक रक्कम नको. लक्षात ठेवा, बँक खात्यात जमा केलेला पैसा हा महागाईला रोखण्यासाठी पुरेसा नाही.

**एक एसआयपीची निवड करणे चुकीचे :** जर महिन्याकाठी २५ हजाराची बचत होत असेल तर पाच वेगवेगळ्या एसआयपीमध्ये गुंतवणूक करायला हवी. यामागे एकच उद्देश असा की, जर एखादा एसआयपी नकारात्मक परतावा देत असेल तर त्याची भरपाई दुसरी एसआयपी करून देऊ शकते.

**इक्विटी म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीचे गणित**

इक्विटी म्युच्युअल फंड हा गुंतवणूकीचा मूलमंत्र आहे. शंभरमधून आपले वय वजा करा. जर आपले वय ३० असेल तर इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये आपली बचत ७० टक्के असायला हवी. जर याप्रमाणे सध्या आपण ६० वर्षाचे असाल तर इक्विटी योजनातील गुंतवणूक ही ४० टक्क्यांपर्यंत करावी.

**उत्पन्नानुसार गुंतवणूक :** तीस वर्षाच्या काळात इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये ७० टक्क्यांपर्यंत गुंतवणूक करायला हवी. त्यानंतर दहा टक्के सोने, २० टक्के एफडी, पीपीएफ आणि आरडीत करायला हवे.

चाळीशीत असताना इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये ६० टक्क्यांपर्यंत गुंतवणूक करावी. त्यानंतर सोन्यात दहा टक्के आणि मुदत ठेवी, पीपीएफ आणि आरडीत ३० टक्के करावी. पन्नाशीत असताना म्युच्युअल फंडमध्ये ५० टक्के गुंतवणूक करावी. सोन्यात दहा आणि उर्वरित ४० टक्के गुंतवणूक ही डेट फंडमध्ये करावी.




**गुंतवणूकीत सोन्याचा समावेश :** सोन्यासाठी आदर्श गुंतवणूक ही आपल्या आर्थिक पोर्टफोलिओच्या दहा टक्के असणे गरजेचे आहे. जर आपला आर्थिक पोर्टफोलिओ ५० लाखाचा असेल तर आपण पाच लाखांपर्यंत गोल्ड म्युच्युअल फंड आणि गोल्ड इटीएफमध्ये गुंतवणूक करायला हवी.

**विमा कवच किती? :** जीवन विमा कवच हे आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या किमान सात पट अधिक असावे. जर आपले वार्षिक वेतन ८ लाखांपेक्षा अधिक असेल तर त्यापेक्षा अधिक लाइफ इन्शूरन्स प्लॅन जसे की टम प्लॅन, यूएलआयपी आणि पारंपारिक योजना असे एकत्र मिळून किमान ५० लाखाचा कव्हर असणे गरजेचे आहे.

**आरोग्य विमा कितपत? :**

जर आपण एकटे असेल तर आपल्याला दोन लाख रुपये विमा कवच पुरेसा आहे. मुलांसह किंवा मुलं नसताना कोणत्याही जोडप्यासाठी आरोग्य विमा हा किमान पाच लाखाचा असावा. जर आई वडिल हयात असतील आणि ते आपल्यावर अवलंबून असेल तर दहा लाखाची फॅमिली फ्लोटर विमा योजना घ्यायला हवी.

◆◆◆

# बाल विमा योजनेच्या अंतरंगात...

भारतीय टपाल विभागाने म्हणजे पोस्टाने पाल्यांच्या उज्वल भवितव्यासाठी बाल विमा योजना आणली आहे. टपाल खाते हे ग्रामीण भागापासून दुर्गम भागापर्यंत पोचलेले आहे. म्हणून ग्रामीण भागातील नागरिक या योजनेच्या मदतीने मुलाचे भवितव्य चांगले करू शकतात. या योजनेत कोणताही व्यक्ती गुंतवणूक करू शकतो. मॅच्योरिटीचा कालावधीनंतरही विमा कवचची संपूर्ण रक्कम मिळवू शकतो.

■ **वैशिष्ट्ये कोणती?:** पोस्टाच्या बाल विमा योजनेची वैशिष्ट्ये ही खासगी कंपन्यांच्या विमा योजनेच्या चिल्ड्रन इन्शूरन्स प्लॅनपेक्षा वेगळी आहेत. या योजनेची पात्रता ही पाच वर्ष ते २० वर्षापर्यंत आहे. पाच वर्षाच्या वयोगटातील मुलांसाठी ही योजना खरेदी करू शकतो. ही योजना खरेदी करणाऱ्या पालकांचे कमाल वय ४५ वर्ष असू शकते. पोस्टाची बाल विमा योजना ही कमाल दोन मुलांसाठी घेता येते. अर्थात ही योजना एका कुटुंबातील केवळ दोन मुलांना कवच प्रदान करते. या पॉलिसीत नॉमिनी बदलण्याची सुविधा आहे.

■ **किती जोखीम? :** या पॉलिसीचे कमाल जोखीम कवच ही तीन लाख रुपये आहे. पॉलिसी परिपक्वतेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर जोखीम कवचाची रक्कम ही बोनसबरोबर विमाधारकाला प्रदान केली जाते. परिपक्वता कालावधीपर्यंत त्याचा हप्ता पालकांकडून भरला जातो. विशेष म्हणजे पालकाची जोखीम देखील यात सामील होते. पालकाचा मृत्यू झाल्यास पाल्याला किंवा वारसदाराला पॉलिसीचा हप्ता भरण्याची गरज नाही आणि योजनेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर कवचाची रक्कम ही संबंधितास प्रदान केली जाते. याशिवाय पॉलिसीधारकाच्या अपत्याचा मृत्यू होत असेल तर विमा कंपनी ही जोखीम कवच रक्कम आणि बोनसची रक्कम पालकाला देते. बोनसची रक्कम ही प्रति हजार ५० रुपयांपेक्षा अधिक असते.



■ **मेडिकल चाचणीची गरज नाही :** एखादा पालक पाल्यासाठी विमा योजना खरेदी करत असेल तर मुलाची किंवा त्याची वैद्यकीय चाचणी करण्याची गरज नाही. कारण मुलांमध्ये आजारपणाचे प्रमाण कमी असते. एखाद्या मुलाला आजारपण असेल तर ते अपवादात्मक राहते. पालकाचे कमाल वय ४५ ठेवले आहे. यापर्यंतच्या वयोगटातील व्यक्तीची तब्येत चांगली राहते.

■ **कोणत्या कागदपत्राची गरज? :** पोस्टाच्या बाल जीवन विमा योजनेसाठी अर्ज भरताना पालकाला मुलाचे आणि स्वत:चे ओळखपत्र सादर करावे लागते. आधार कार्ड, रेशन कार्ड आदीच्या साक्षांकित प्रती जोडाव्या लागतात. जन्मतारखेचा दाखला, रहिवासी पुरावा, पासपोर्ट आकाराचे फोटो आदी कागदांची गरज भासते.

■ **कर्ज मिळत नाही :** पोस्टाच्या बाल जीवन विमा योजनेवर कोणत्याही प्रकारचे बँक कर्ज किंवा पोस्टाकडून कर्ज मिळत नाही. अर्थात या योजनेंर्तगत पालक पेड अप प्लॅनची सुविधा घेऊ शकतो. यासाठी सलग पाच वर्ष हप्ता नियमितपणे भरणे गरजेचे आहे. यापेक्षा कमी कालावधीसाठी हप्ता भरला तर टपाल खाते पेड प्लॅन बदलण्याची सुविधा देत नाही.

◆◆◆

# वार्धक्यासाठी करा युक्तीने आर्थिक नियोजन

***बचतीतून गुंतवणूक तयार होते. नोकरदारांची बचत नोकरीच्या प्रारंभिक काळापासूनच सुरु झाली, तर व्यक्ती मध्यमवयीन असताना योग्य मार्गाने त्याची गुंतवणूक होऊ शकते. परंतु काही जणांना पगार कमी असल्यामुळे खर्चाचा ताळमेळ घालून बचत करणे शक्य होत नाही. अशा लोकांनी निवृत्तीच्या वेळी मिळणाऱ्या रकमेची विभागणी करून वेगवेगळ्या पर्यायांमध्ये गुंतवणूक केली, तर उत्पन्न मिळू शकते आणि वार्धक्यासाठी सन्मानजनक रक्कम हातात राहू शकते.***



■ अर्थनियोजन

नोकरदार व्यक्ती जेव्हा आपल्या भविष्यासाठी आर्थिक नियोजन करते, तेव्हा त्याच्यासमोर दोन पर्याय असतात. पहिला पर्याय बचतीचा, तर दुसरा गुंतवणुकीचा असतो.

● बचत आणि गुंतवणूक एकमेकांना पूरक असल्यामुळे बचतीविना गुंतवणूक शक्य नाही. नोकरीच्या प्रारंभीच्या काळापासूनच बचत केली जाते आणि त्यातून एक मोठी रक्कम निर्माण झाल्यानंतर ती वित्तीय योजनांमध्ये गुंतविली जाते. म्हणजेच मध्यमवयीन असण्याच्या काळात गुंतवणुकीस सुरुवात होते आणि वृद्धापकाळात त्याचा लाभ मिळतो. परंतु अनेकजण पगार कमी असल्यामुळे अखेरपर्यंत बचत करूच शकत नाहीत. त्यामुळे त्यांची गुंतवणूकही नगण्य असते. अशा व्यक्तींना वृद्धापकाळात मोठ्या संकटांना सामोरे जावे लागते. परंतु अशा व्यक्तींनी निराश होण्याची गरज नाही.

● अनेकांना पेन्शन मिळत नसली तरी ग्रॅज्युइटी आणि प्रॉव्हिडेन्ट फंड नक्कीच मिळतो. गुंतवणुकीच्या दोन-तीन पर्यायांची निवड करून ही रक्कम गुंतविल्यास वार्धक्यात चांगला परतावा मिळू शकतो. मुदत ठेव, म्युच्युअल फंड, विमा पॉलिसी आणि मालमत्तेची खरेदी हे गुंतवणुकीचे काही पर्याय होत.

● गुंतवणुकीच्या या पर्यायांमध्ये थोडी-थोडी रक्कम ठेवली, तर चांगला नफा कमावणे शक्य असते.

● समजा, निवृत्तीच्या वेळी तीस लाख रुपये प्रॉव्हिडेन्ट फंड मिळाला. हा पैसा तसाच पडून ठेवला, तर कधीतरी तो संपून जाईल. त्यामुळे सर्वप्रथम यातील दहा लाख रुपये सरकारी बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावेत. सामान्यतः नऊ वर्षांनी बँका दामदुप्पट परतावा देतात. म्हणजेच नऊ वर्षांत दहा लाखांचे २० लाख होतील. अर्थातच दरवर्षी एक लाख रुपयांची कमाई होईल. त्याचप्रमाणे काही रक्कम म्युच्युअल फंडात गुंतवावी. यात नऊ ते बारा टक्क्यांपर्यंतचा परतावा निश्चित मिळतो.

● अशा एखाद्या योजनेत दहा लाखांची रक्कम गुंतविल्यास दरवर्षी १ लाख २० हजार रुपयांचे उत्पन्न सुरू होईल. अशाच काही पर्यायांमध्ये गुंतवणूक केल्यास वृद्धापकाळासाठी सन्मानजनक रक्कम हातात उपलब्ध राहील.

● एखादी कॅशलेस मेडिक्लेम पॉलिसी घेतली तरी वृद्धापकाळात आजारपणांवर होणाऱ्या खर्चांमधून सुटका होऊ शकते. तिसरा पर्याय मालमत्तेत गुंतवणूक करण्याचा आहे. ही मालमत्ता व्यावसायिक किंवा रहिवासी असली तरी चालेल. निवासी घरे आता महाग झाली असली, तरी दुकानाचा गाळा घेऊन ठेवल्यास तो भाड्याने देऊन मासिक उत्पन्न मिळविणे शक्य आहे.

◆◆◆

जीवन विमा हा आपल्या आर्थिक नियोजनातील महत्त्वाचा घटक असून त्यावर नेहमीच चर्चा होते. पारंपारिक रुपाने जीवन विमा हा कुटुंबातील कर्त्या पुरुषाचा उतरवला जातो. मात्र बदलत्या काळात कुटुंबातील दोघांचा विमा उतरवणे आवश्यक आहे. असे असले तरी बहुतांश मंडळी अजूनही सिंगल लाइफ इन्शूरन्स उतरवतात. परिणामी संयुक्त विमा उतरवण्यास फारसे प्राधान्य दिले जात नाही. दोन्ही प्रकारच्या विम्याचे काय लाभ आहेत, याचे स्पष्टीकरण इथे दिलेले आहे.

# जॉईंट की सिंगल?



■ **संयुक्त जीवन विमा :** आपल्या नावाप्रमाणेच एक संयुक्त जीवन विमा पॉलिसीत स्वत:बरोबरच जोडीदाराचा देखील पॉलिसी कॉन्ट्रॅक्टमध्ये समावेश केला जातो. यासाठी दर महिन्याला एकच हप्ता भरावा लागतो. ही योजना आपल्यासाठी आणि जोडीदारासाठी व्यापक संरक्षक मानली जाते. अर्थात संयुक्त पॉलिसीत पहिल्या मृत्यूसाठीच विमा कंपनी भरपाई देते. म्हणजेच पती किंवा पत्नी यापैकी एकाचा अगोदर मृत्यू होत असेल तर पॉलिसीतील दुसऱ्या व्यक्तीला त्यानंतर विमा कवच लाभणार नाही. अशावेळी जॉइंट टर्म प्लॅन्समध्ये दोनदा भरपाईचे देखील नियोजन आहे. याचाच अर्थ की ही योजना विमाधारकांचा म्हणजे दोघांचा मृत्यू झाल्यास दोघांचीही भरपाई दिली जाते.

■ जाणून घ्या

■ **फायदा आणि नुकसानीचे आकलन:** एक संयुक्त जीवन विमा पॉलिसीचा प्रमुख फायदा म्हणजे त्याचा हप्ता वाजवी आहे. कारण दोन वेगवेगळे टर्म इन्शूरन्स खरेदी करण्याच्या तुलनेत ही योजना स्वस्त आहे. ज्यांचे बजेट मर्यादित आहे,अशांसाठी जॉइंट टर्म पॉलिसी हा चांगला पर्याय राहिल. मात्र त्याचबरोबर एक अट देखील असेल. पॉलिसीचा हप्ता हा आरोग्यावर अवलंबून असेल.

जर आपण किंवा जोडीदार हा आरोग्याच्या दृष्टीने अशक्त असाल तर जोडीदारासाठी मोठा हप्ता भरावा लागेल. त्याचवेळी जर सिंगल पॉलिसी असेल तर हप्ता कमी राहू शकतो. घटस्फोटप्रकरणात अशा प्रकारची पॉलिसी फारशी उपयुक्त ठरत नाही. घटस्फोटानंतर पॉलिसीची दोन भागात विभागणी करता येणार नाही. म्हणून पती-पत्नी दोघांकडे वेगळी किंवा स्वतंत्र पॉलिसी असेल तर घटस्फोट झाल्यास पॉलिसीवर त्याचा परिणाम होत नाही.

■ **एकल जीवन विमा कवच:** जोडप्यांसाठी जॉइंट लाइफ कव्हर चांगला पर्याय वाटत असला तरी दोघांनी वेगवेगळी पॉलिसी घेणे फायद्याचे राहू शकते. प्रत्येक सदस्याचा मृत्यू झाल्यास वारसदारांना त्याची भरपाई मिळते. एकल जीवन विमा योजना या एका व्यक्तीला कवच प्रदान करते. त्याच्या मृत्यूनंतर वारसदारांना त्याची भरपाई दिली जाते. वेगवेगळी पॉलिसी घेतल्याने प्रत्येक व्यक्तीसाठी विम्याची वेगळी रक्कम निश्चित करता येते. कारण काही मंडळी कुटुबांतील आर्थिक सुरक्षेसाठी जादा विमा कवच असणारी पॉलिसी खरेदी करतात.

■ **लक्षात ठेवा:** दोन्ही पॉलिसीचे फायदे आणि नुकसान वेगवेगळे आहेत. परिस्थितीनुसार पर्यायाची निवड करणे हे हिताचे ठरते. बहुतांश मंडळी आपल्या गरजेनुसार जॉइंट पॉलिसी घेण्याचा आग्रह करतात. कारण त्यांच्या बिगर नोकरदार जोडीदाराला विमा कवचाचा लाभ मिळतो. त्याचवेळी दोन वेगवेगळ्या पॉलिसी खरेदी करुन अतिरिक्त सुरक्षा आणि सुविधा लाभ घेण्याबाबत नागरिक दक्ष असतात.

◆◆◆

# रोजगारासाठीही चांगला क्रेडिट स्कोर गरजेचा

एखादा व्यक्ती बँकेतून कर्ज घेतो तेव्हा त्याच्या क्रेडिट स्कोरची तपासणी केली जाते. क्रेडिट स्कोर चांगला असेल तर तात्काळ त्याच्या कर्जाला मंजुरी दिली जाते. म्हणजेच कर्ज मिळवायचे असेल तर क्रेडिट स्कोर चांगला असणे आवश्यक आहे. कारण कर्ज प्रकरण मंजूर करताना बँक क्रेडिट स्कोरकडे एक निकष म्हणून पाहत असतात. मात्र चांगला क्रेडिट स्कोर हा केवळ कर्जासाठीच नाही तर नोकरीसाठी देखील गरजेचा झाला आहे. काही बँकाकडून आता उमेदवारांच्या सिबिल स्कोरची तपासणी केली जात आहे. म्हणून तरुणांना, सध्या नोकरी करणाऱ्या मंडळींना नवीन नोकरीचा शोध घ्यायचा असेल तर त्यासाठी क्रेडिट स्कोरकडे देखील लक्ष द्यावे लागणार आहे.

**क्रेडिट स्कोर किंवा क्रेडिट रिपोर्ट**

एखादा व्यक्ती कोणत्याही आर्थिक संस्था किंवा बँकेतून कर्ज घेत असेल किंवा एखाद्या बँकेचे क्रेडिट कार्डचा वापर करत असेल तर त्याच्या आर्थिक व्यवहारावर लक्ष ठेवले जाते. संबंधित व्यक्तीने हप्ता वेळेवर भरला आहे की नाही, क्रेडिट कार्डने खर्च केलेली रक्कम वेळेत भरली आहे की नाही या बाबींचे आकलन केले जाते. तसेच संबंधित व्यक्तीचा एखादा धनादेश स्वीकारला जात आहे की नाही किंवा कर्ज डिफॉल्ट तर झाले नाही ना, अशा सर्व घडामोडींवर गुण दिले जातात. त्यानुसार क्रेडिट स्कोर कमी जास्त होत असतो. एखाद्या व्यक्तीचा क्रेडिट रिपोर्टमध्ये क्रेडिट स्कोर बराच कमी असेल तर बँकांकडून अशा व्यक्तीला कर्ज दिले जात नाही.

**क्रेडिट स्कोर कोण निश्चित करते?**

सरकारने क्रेडिट स्कोर निश्चित करण्यासाठी आणि त्याच्यावर देखरेख करण्यासाठी चार कंपन्यांना परवाने दिले आहेत. या चार कंपन्यांत ट्रान्सयूनियन सिबिल, इक्विफॅक्स, एक्स्पेरियन आणि सीआरआयएफ हायमार्क याचा समावेश आहे. या संस्थांवर प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक घडामोडींची माहिती एकत्र करणे आणि त्याचा अहवाल तयार करणे याची जबाबदारी सोपविली आहे. या कंपन्या देशातील प्रत्येक नागरिकांची आर्थिक माहिती गोळा करत क्रेडिट स्कोर तयार करत असतात. देशातील सर्व बँक खाते एकमेकांशी जोडलेले असल्याने या कंपन्यांच्या कोणत्याही व्यक्तीची माहिती गोळा करण्यास फार वेळ लागत नाही.




**कोणत्या डेटाच्या आधारे अहवाल?**

क्रेडिट रिपोर्ट तयार करण्यासाठी या चार संस्था या देशातील प्रत्येक नागरिकांच्या बँक खात्याच्या विवरणाची माहिती गोळा करतात आणि त्याचा क्रेडिट रिपोर्ट तयार करत असतात. रिपोर्ट करताना कर्जफेडीची स्थिती, क्रेडिट कार्डवरील कर्ज, चेक बाउन्स स्थिती, धनादेशाच्या माध्यमातून होणारे व्यवहार आदींची माहिती एकत्र केली जाते. प्रत्येक आर्थिक व्यवहारासाठी गुण ठरलेले असतात. आर्थिक व्यवहारात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा असेल तर त्याला चांगले गुण मिळतात. पण कामगिरी खराब असेल तर कमी गुण मिळतात,

**किती स्कोअर असावा?**

आपला आर्थिक रिकॉर्ड चांगला राहण्यासाठी क्रेडिट स्कोर किती असावा, हे माहित असणे गरजेचे आहे. ८०० ते ८५० गुण हे सर्वोत्तम मानले जाते. याशिवाय एखाद्याचा क्रेडिट स्कोअर हा ७४० ते ७९९ असेल तर तो चांगल्या श्रेणीत मोडतो. ६७० ते ७३९ क्रेडिट स्कोअर हा ठीक श्रेणीत आणि ५८० ते ६६० स्कोअर हा समाधानकारक मानला जातो. मात्र एखाद्याचा क्रेडिट स्कोर यापेक्षा कमी असेल तर तो खराब श्रेणीत जातो. एवढे कमी गुण असलेल्या व्यक्तीला कर्ज देण्यास मनाई केली जाते. तसेच नोकरीची हमी मिळत नाही.

**नोकरीसाठी क्रेडिट स्कोरचे महत्त्व**

बँक आणि अन्य आर्थिकसेवेत नोकरी मिळवण्यासाठी आता आपल्या क्रेडिट स्कोरची तपासणी केली जाऊ शकते. एखाद्या व्यक्तीचा क्रेडिट स्कोर चांगला नसेल तर आणि बँकेने त्याला लोन डिफॉल्टर म्हणून जाहीर केले असेल तर त्याला आर्थिक संस्थेत सहजासहजी नोकरी मिळणार नाही. विशेष म्हणजे लेखी परीक्षा पास केली असेल तरीही त्याचा परिणाम मुलाखतीवर होऊ शकतो. सध्या देशातील प्रमुख बँकांनी आपल्याकडे नोकरी देण्यासाठी क्रेडिट स्कोरची तपासणी सुरु केली आहे. याशिवाय अन्य आर्थिक संस्थांनी देखील नोकरी देताना चांगला क्रेडिट स्कोअर असणाऱ्या मुलांना प्राधान्य दिले आहे. देशात काम करणाऱ्या अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या देखील अर्जदारांचा सिबिल स्कोर तपासत आहेत आणि नंतरच त्यांना लेखी परीक्षा आणि मुलाखतीसाठी बोलावले जाते. त्यामुळे आर्थिक व्यवहार नेहमीच पारदर्शक, प्रामाणिक राहतील यासाठी सजग असणे गरजेचे आहे. जेणेकरून भविष्यात नोकरी मिळवण्यासाठी अडचणी येणार नाहीत.

◆◆◆

# बॅलेन्स ॲडव्हान्टेज फंडच्या अंतरंगात...

बॅलेन्स्ड ॲडव्हान्टेज फंड हे नाव वाचूनच साहजिकच ही योजना गुंतवणुकीला संतुलित करण्याचे काम करते, हे स्पष्ट होते. म्हणजेच या फंडमध्ये गुंतवणुकीची असणारी रक्कम इक्विटी आणि डेटमध्ये जाते. त्यात कमी जास्त गुंतवणूक होत राहते. बाजार उच्च पातळीवर असेल तर गुंतवणूक इक्विटीतून काढून बाँडमध्ये टाकण्यात येते. जर बाजार नीचांकी पातळीवर असेल तर बाँडमधील गुंतवणूक कमी करून इक्विटीत वाढवण्यात येते. त्यामुळे गुंतवणूकदारांना संतुलित परतावा मिळतो. डेटनुसार गुंतवणुकदाराची रक्कम ही फिक्स्ड इन्कम असणाऱ्या सरकारी योजना, कंपन्या अणि खासगी कंपनीत जाते.

मध्यम कालावधीसाठी सरासरी परतावा

म्युच्युअल फंडमधील गुंतवणूक ही साधारपणे दीर्घ कालावधीसाठीची गुंतवणूक मानली जाते. बॅलेन्स्ड फंडमधून मध्यम कालावधीसाठी देखील सरासरी परतावा मिळतो. आकडेवारीवर नजर टाकल्यास, बॅलेन्स्ड फंडने दहा वर्षांत दहा ते बारा टक्क्यांपर्यंत परतावा दिला आहे आणि तो सध्याच्या काळात हा चांगला परतावा आहे. अर्थात इक्विटी फंडमध्ये हा परतावा अधिक राहू शकतो. यात जोखीम देखील अधिक असते.



कोणत्या गुंतवणूकदारांसाठी फायद्याचा?

बॅलेन्स्ड फंडची याजना ही साधारपणे कमी जोखीम पत्करणाऱ्या गुंतवणुकदारांचे हित लक्षात ठेऊन तयार केली आहे. हा फंड दीर्घकाळासाठी चांगला परतावा देतोच, त्याचबरोबर मध्यम कालावधीतही चांगला परतावा मिळतो. या फंडची हिस्ट्री पाहिली तर दहा वर्षात दहा टक्क्यांपेक्षा अधिक परतावा मिळाला आहे.

■ फंड झोन..

किती प्रकारचे असतात फंड?

बॅलेन्स्ड फंड हे सर्वसाधारपणे चार श्रेणीत विभागलेले असतात. पहिल्या श्रेणीत डेट फंड असतात. दुसऱ्या श्रेणीत इक्विटी, तिसऱ्यात मल्टी असेट अलोकेशन आणि चौथ्या श्रेणीत आर्बिटाज लिंक्ड फंड असतो. गुंतवणूकदारांना शॉर्ट टर्म, मिड टर्म आणि लाँग टर्म मध्ये किमान दहा ते बारा टक्का सरासरी परतावा मिळेल, या हेतूने या चार श्रेणीची रचना केली आहे.

कोणत्या निर्देशांकात होते गुंतवणूक?

बॅलेन्स्ड ॲडव्हान्टेज फंडची रचना कमी जोखमीची आहे.त्यामुळे फंड मॅनजर गुंतवणुकीची रक्कम ही लार्जकॅप किंवा ब्लूचिप कंपनीत ठेवतात. या कंपन्यांत मोटेलिटीची शक्यता कमी असते. त्यामुळे बाजार पडल्यास गुंतवणूकदारांना फारसे नुकसान सहन करावे लागत नाही. डेटमध्ये देखील हे फंड अशा सिक्युरिटीजमध्ये ठेवतात की तेथे नुकसानीची शक्यता कमीच राहते. म्हणजेच सुरक्षित श्रेणीत गुंतवणूक केली जाते.

रणनिती अगोदरच ठरलेली असते

बॅलेन्स्ड ॲडव्हान्टेज फंडमध्ये होणारी गुंतवणूक आणि त्यानंतर होणारे असेट अलोकेशन आदी सर्वकाही अगोदरच ठरलेले असते. कोणत्या परिस्थितीत अलोकेशनमध्ये बदल करायचा आहे, हे अगोदरच निश्चित केलेले असते. इक्विटीत कधी रक्कम वाढवायची आणि कधी कमी करायची हे ठरलेले असते. त्यामुळे बाजार वाढणे किंवा पडण्याच्या प्रभावाखाली फंड मॅनेजर येत नाही. परिणामी या श्रेणीत जोखीम कमी राहते.

◆◆◆

# कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारणे ही काळाची गरज

## खा. शरद पवार यांचे प्रतिपादन; केडगावमध्ये श्री अंबिका विद्यालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन, रयत शिक्षण संस्थेत एआय आधारित शिक्षणाची नवी दिशा

नगर – तंत्रज्ञानाच्या युगात आपल्यासमोर अनेक नवीन आव्हाने उभी राहत आहेत. या बदलत्या काळाशी जुळवून घेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करणे ही आजच्या काळाची आवश्यकता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आज सर्व क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणत आहे. शिक्षण क्षेत्रातही एआयचा उपयोग करून विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक सुलभ, दर्जेदार आणि आधुनिक करण्याचे प्रयत्न रयत शिक्षण संस्थेमार्फत सुरू झाले असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री खा. शरद पवार यांनी केले.

केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी खा. शरद पवार बोलत होते. प्रारंभी कोनशीलेचे अनावरण आणि फीत कापून नव्या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर पाहुण्यांच्या हस्ते विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. रयत शिक्षण संस्था (सातारा) चे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी खासदार निलेश लंके, विभागीय चेअरमन आशुतोष काळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा.आ. दादाभाऊ कळमकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर, पद्मश्री पोपट पवार, अ‍ॅड. भगीरथ शिंदे, डॉ. अनिल पाटील, मा.आ. राहुल जगताप, बाबासाहेब भोस, विकास देशमुख, रयतचे उत्तर विभाग अधिकारी प्राचार्य नवनाथ बोडखे, शिवलिंग मेनकुदळे, राजेंद्र मोरे, बंडू पवार, संजय नागपूरे, तुकाराम कन्हेरकर, डॉ. मेहेरनोश मेहता, जनरल बॉडी सदस्य अभिषेक कळमकर, शिवाजीराव भोर, ज्ञानदेव पांडूळे, अर्जुन पोकळे, अंबादास गारुडकर, हाजी शौकत तांबोळी, आदींसह स्कूल कमिटी व सल्लागार समितीचे सर्व सदस्य, रयत सेवक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.




केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी खा. शरद पवार बोलत होते. प्रारंभी कोनशीलेचे अनावरण आणि फीत कापून नव्या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. तर दुसऱ्या छायाचित्रात रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागास संस्थेचा आदर्श विभागीय पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार अशितोष काळे व प्राचार्य नवनाथ बोडखे यांचा खा. शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पुढे खा. शरद पवार म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेने लोकांच्या जीवनात मोठा बदल घडवला आहे. शेती क्षेत्रातही या तंत्रज्ञानाचा चांगला वापर होऊ शकतो. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. तसेच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असले तरी, या संकटावर मात करून शेतकऱ्यांनी पुढे जाण्याचे आवाहनही त्यांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी एक मिशन घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाचा प्रचार-प्रसार केला. यामुळे नवीन पिढी तयार झाली. त्याचा परिणाम अनेक मुले-मुली या वटवृक्षाखाली शिक्षण घेऊन जीवनात यशस्वी झाले. संस्थेचा कारभार विस्तारित करण्यासाठी अनेकांनी योगदान दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभाग अधिकारी प्राचार्य नवनाथ बोडखे यांनी विद्यालयाच्या स्थापनेपासून ते नव्या वास्तूच्या उभारणीपर्यंतचा प्रवास सांगितला. सन १९६९ मध्ये स्थापन झालेल्या या विद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी ३ कोटी ८१ लाख रुपये खर्च करून सर्व सुविधा असलेले अत्याधुनिक संकुल उभारण्यात आले आहे. कला शिक्षकांनी विद्यालयाचे परिसर सजविण्यात मोलाचे योगदान दिले असून, सर्व देणगीदार व सहकार्यकर्त्यांचे त्यांनी आभार मानले.

विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले, तर एआय उपकरणे आणि रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटनही या प्रसंगी करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागास संस्थेचा आदर्श विभागीय पुरस्कार मिळाल्याबद्दल आमदार अशितोष काळे व प्राचार्य नवनाथ बोडखे यांचा खा. शरद पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी इमारत उभारणीस योगदान देणारे व देणगीदारांचा विशेष सत्कार करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी म्हणाले की, या शाळेच्या इमारतीचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले असून, भविष्यात इतर शाळांसाठी हे संकुल एक मॉडेल ठरेल. संस्थेच्या माध्यमातून रोबोटिक, थ्रीडी पेंटिंग, कोडिंग इत्यादी शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात आहे. हा अभ्यासक्रम इतर संस्था देखील मागत असून, यावरुन संस्थेच्या गुणवत्ता व नवीन शैक्षणिक धोरणाचा केलेला अवलंब लक्षात येत आहे. लवकरच एआरपीद्वारे सर्व काम पेपरलेस करण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची त्यांनी माहिती दिली.

सूत्रसंचालन बाबासाहेब जगदाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व सेवकांनी परिश्रम घेतले.






## घराचे कुलूप तोडून सोन्या चांदीच्या दागिन्यांसह रोख रकमेची चोरी

नगर – गावात सुरु असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहासाठी घराला कुलूप लावून गेलेल्या कुटुंबाचे घर अज्ञात चोरट्यांनी फोडून घरातील सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख ५८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील कौडगाव शिवारात १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ ते रात्री १० वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत संदीप मारुती खर्से (वय ४२, रा. कौडगाव, ता.नगर) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय हे १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास घराला कुलूप लावून गावात सुरु असलेल्या सप्ताहाच्या कार्यक्रमाला गेले होते. रात्री १० वाजता ते पुन्हा घरी आले, तेव्हा त्यांची पाळीव जनावरे घराच्या परिसरात मोकळी फिरताना आढळली. त्यांनी घराचा दरवाजा पाहिला असता त्याला लावलेले कुलूप तुटलेले दिसले. नंतर त्यांनी घरात जावून पाहिले असता घरात सर्वत्र उचकापाचक केल्याचे त्यांना दिसून आले. घरातील गोदरेज चे कपाट ही उघडे दिसले. त्या कपाटातून चोरट्यांनी सोन्या चांदीचे दागिने व ३० हजारांची रोकड असा १ लाख ५८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी नगर तालुका पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर खर्से यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.






### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक श्री. हनुमान रामय्या मद्दा, रा.९१-ब, पाईपलाईन रोड, श्रमिक नगर,सावेडी, अहिल्यानगर यांचे मालकीची असून सदर मिळकतीचा व्यवहार आमचे अशिला बरोबर झालेला असून लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही **प्रकारे चालु वाद, साठेखत, खरेदीखत, विसारपावती, करारनामा, मालकी हक्क,हितसंबंध,ताबा,मनाई,जप्ती, दावा, लिज, गहाण, दान,बक्षिस, पोटगी हक्क,सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे. जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** :- जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे सावेडी** येथील **श्रमिक जनता नगर सह. भा.मा. हौसिंग सोसा. मर्या., अहमदनगर मधील** खालील वर्णनाची मिळकत -

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| २४/१/अ/२४/२ | ९१ ब | ५६.२५ चौ.मी |

**(७/१२ उताऱ्याप्रमाणे २४/१/अ/२४/२/प्लॉट ९१ ब चे क्षेत्र ०.५६.२५ आर.चौ.मी.) हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील पत्र्याचे छत असलेले बांधकाम क्षेत्र २८.१२५ चौ.मीटर ही संपूर्ण बांधकामासह मिळकतीबाबत. यांसी चतु:सिमा - महसुल रेकॉर्ड प्रमाणे- येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखुन न ठेविता.**

दि.२०/१०/२०२५.
विद्यमान मालकाची सही
श्री. हनुमान रामय्या मद्दा

**अ‍ॅड.सागर एस. सोनवणे**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
ऑफिस : अमेय चेंबर्स, बेसमेंट ए-४, कोर्टगल्ली,
अहिल्यानगर-४१४००१, मो : ७६२०९६११७१,९९२२६६४८४८

## कोड्सपासून कार्बनपर्यंत : भारत आणि ऑस्ट्रेलिया वेगळं का बांधतात? वर व्याख्यान

### इमारतीच्या रचनेचा थेट परिणाम आपल्या शरीरावर आणि आरोग्यावर होतो : सुयश पारिख

नगर – आर्किटेक्ट इंजिनीअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने कोड्सपासून कार्बनपर्यंत: भारत आणि ऑस्ट्रेलिया वेगळं का बांधतात? या विषयावर सुयश परिख यांचे प्रेरणादायी व्याख्यान नुकतेच पार पडले. या कार्यक्रमास पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे आणि आदेश गूंगे, तसेच संस्थेचे प्रदीप तांदळे, भुषण पांडव, सुनिल औटी, संतोष खांडेकर, गौरव मांडगे, संकेत पादिर, सचिन डागा, अनमोल जैन आणि इतर सभासद उपस्थित होते.



कोड्सपासून कार्बनपर्यंत : भारत आणि ऑस्ट्रेलिया वेगळं का बांधतात? या विषयावर व्याख्यान सुयश पारिख यांचे व्याख्यान झाले. (छाया – लहू दळवी)

सुयश परिख हे सध्या ऑस्ट्रेलियात सस्टेनेबल आणि ग्रीन बिल्डिंग डिझाईन क्षेत्रात कार्यरत असून, भारतातही त्यांचे अनेक प्रकल्प सुरू आहेत. पर्यावरणपूरक बांधकाम आणि मानवी आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, इमारती या आपल्या तिसऱ्या त्वचेप्रमाणे असतात. बाह्य हवामानाचा जसा थेट परिणाम इमारतीच्या रचनेवर होतो, तसाच इमारतीच्या रचनेचा थेट परिणाम आपल्या शरीरावर आणि आरोग्यावर होतो. त्यांच्या डिझाईन तत्त्वज्ञाना बद्दल बोलताना सुयश म्हणाले, इमारती आपल्या आरोग्यावर आपल्या कल्पनेपेक्षा जास्त प्रभाव टाकतात. प्रकाश, हवा, तापमान आणि साहित्य यांची निवड आपल्याला आरोग्यदायी बनवू शकते – किंवा हानिकारक ठरू शकते. प्रत्येक आराखडा म्हणजे मानवी आरोग्य आणि आरामासाठी लिहिलेली एक वैद्यकीय चिठ्ठी आहे.

सध्या औद्योगिक प्रदूषण, वाहनांमुळे वाढणारे धूर आणि उर्जेचा अतिवापर या कारणांमुळे पर्यावरणीय असंतुलन वाढत आहे. या संदर्भात त्यांनी पुढे सांगितले की, जर इमारती जागतिक ऊर्जेच्या आणि कार्बन उत्सर्जनाच्या ४० टक्के भागासाठी जबाबदार असतील, तर आर्किटेक्ट, इंजिनीअर आणि विकासक (डेव्हलपर्स) हे त्या समस्येच्या ४० टक्के उपायाचा भाग आहेत. प्रत्येक डिझाईन निर्णय म्हणजे पृथ्वीच्या आरोग्याकडे टाकलेले एक सकारात्मक पाऊल आहे.

व्याख्यानात भारत आणि ऑस्ट्रेलियातील बांधकाम नियम (Codes), हवामानाला प्रतिसाद देणाऱ्या रचना (Climate Response), वापरले जाणारे साहित्य (Materials), आणि बांधकामाची मानसिकता (Mindset) या चार मुख्य घटकांवर त्यांनी तुलनात्मक विश्लेषण केले.

सुयश यांनी दोन्ही देशांतील ऊर्जा कार्यक्षमता, कार्बन उत्सर्जन नियंत्रण आणि टिकाऊ बांधकाम तंत्रज्ञानातील फरक स्पष्ट करत कमी कार्बन असलेल्या भविष्याकडे वाटचाल ही संकल्पना मांडली.

अभिजित देवी यांनी सांगितले, आपल्या शहरात ग्रीन बिल्डिंग्ज उभ्या राहिल्या पाहिजेत. यासाठी आर्किटेक्ट आणि इंजिनीअर्सनी नागरिकांना याबाबत जागरूक करणे आणि साक्षर बनवणे गरजेचे आहे

कार्यक्रमादरम्यान वर्ल्ड आर्किटेक्ट डे आणि व्हॅल्यूअर डे साजरे करण्यात आले. या निमित्ताने सुयश परिख, धीरन सुराणा, वैभव देशमुख, नंदकिशोर घोडके, अजय दगडे, राजकुमार मुनोत, आदिनाथ दहिफळे, सतीश कांबळे, प्रदीप तांदळे आणि अनिल आठरे यांचा केक कापून सन्मान करण्यात आला.

संकेत पादिर यांनी सूत्रसंचालन केले, उदित हिरे यांनी सुयश परिख यांचा परिचय करून दिला. वैशाखी हिरे यांनी आभार मानले.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत आमचे अशिल फिरोज सुलतान तांबटकर यांची स्वकष्टार्जीत मालकी वहिवाटीची आहे. सदर मिळकत आमचे अशिलाने त्यांचे स्वतंत्र व्यावसायिक उत्पन्नाच्या रक्कमेतून खरेदी केली होती. मात्र सदर मिळकत खरेदी करते वेळी त्या मिळकतीबाबत न्यायालयीन प्रकरण चालू होते. सदर प्रकरणाचा निकाल विरुद्ध लागण्याच्या आशंकेमुळे आमच्या अशिलाने त्यांच्या भावाची नावे मिळकतीचे ७/१२ रेकॉर्डला पोकळीस्तरित्या लावली. मात्र त्याबाबत कोणताही नोंदणीकृत, दस्त झालेला नसल्यामुळे केवळ ७/१२ सदरी नोंद झाल्यामुळे आमचे अशिलाचे भावांना त्यामध्ये कोणतेही मालकी हक्क प्राप्त होऊ शकले नव्हते. आमचे अशिलाने स्वखर्चाने सदर जागेत इमारतीचे बांधकाम केले व खरेदीखतापासून आजपर्यंत सदर मिळकत आमचे अशिलाच्या ताब्यात होती व आजही आहेत. सदर मिळकतीबाबत तसेच शहर अहमदनगर येथील जुनी घासगल्ली भागातील सि. स. नं. ३३५२ चा मिळकतीबाबत आमचे अशिलांचे भाऊ युनूस सुलतान तांबटकर यांनी स्पे. मु. नं. ५५/२०११ चा दावा वाटपाकरीता केला होता. सदर दाव्याचा निकाल होऊन त्यांचा दावा अंशत : मान्य करण्यात आला. सदर निर्णयाविरुद्ध आमचे अशिलाने मा. जिल्हा न्यायालय अहमदनगर येथे रेग्युलर अपील नं. २२०/२०२२ व २२१/२०२२ दाखल केले असून सदर अपीलातील स्टे अर्जाची सुनावणी होऊन मा.न्यायालयाने आमचे आशिलाचा स्थगितीबाबतचा अर्ज मंजूर केला असून सदरचा निकालाच्या अपिलाचा निकाल होई पावेतो स्पे. मु.नं.५५/२०११ च्या दाव्याच्या अंमलबजावणीस स्थगितीचा आदेश केला आहे. असे असताना देखील सदर मिळकतीमधील तथाकथित हिस्याच्या परस्पर विक्री करिता आमचे आशिलाचे भाऊ परवेज व युनुस तसेच पुतण्या नविद आरिफ तांबटकर व इतर काही लोक प्रयत्नात असल्याचे आमचे आशिलाचे निदर्शनास आले आहे. तरी या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मिळकतीबाबत कोणीही कोणाबरोबरही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. केल्यास तो मा. न्यायालयाचे हुकुमाचा अवमान होईल व तो आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** :- डि अहमदनगर, सब डि तालुका नगर पैकी शहर अहमदनगर येथील महानगर पालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील जमीन सर्व्हे नं ४०/१ अ याचे क्षेत्र १५ आर याची चतु:सीमा पूर्वेस श्री. अभय मुथा, दक्षिणेस श्री.ए.के. गुगळे अ‍ॅडव्होकेट यांची सर्व्हे नं ४०/१ ब ही मिळकत, पश्चिमेस ८० फूटी पिंपळगाव रस्ता, उत्तरेस ९ मीटर रुंदीचा रस्ता येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक जागा मिळकत.

अहमदनगर
२०/१०/२०२५

**अ‍ॅड. प्रमोद कांतीलाल मेहेर**
ऑफिस - ४, गोवर्धन अपार्टमेंट,
अहमदनगर, मो. नं. ९८२२६२८१३६

## बिल्डींगच्या व्यवहारापोटी ३४ लाख रुपये घेवून फसवणूक

### महिलेच्या फिर्यादी वरून ७ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – बिल्डींगच्या व्यवहारापोटी ३४ लाख ५ हजार रुपये फोन पे तसेच चेकने घेवून महिलेची फसवणूक केल्याची घटना नगर शहरात २९ एप्रिल २०२४ ते १९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत घडली आहे. या प्रकरणी ७ जणांच्या विरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कल्पना चंद्रकांत गव्हाणे (रा. गाडळकर मळा, कल्याण रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा बांधकाम व्यवसाय असून त्यांचे सर्जेपुरा रोड, लालटाकी येथे पंजाब नॅशनल बँकेजवळ कार्यालय आहे. या कार्यालयात आरोपी जीवन प्रकाश मुळे (रा.सहकार नगर, सावेडी, हल्ली रा.पुणे), कल्पना सुरेश सोनसाळे व सुरेश सोनसाळे(दोघे रा.गणेशवाडी, ठाणे), प्रणिती वरकड (रा.अहिल्यानगर), योगेश चुंभळकर (रा.गुंडेगाव, ता.नगर), दिनेश सिद्धुजी सोळंकी, पंकज भीमराज सिंग यांनी बिल्डींग च्या विक्रीचा व्यवहार ठरविला. त्यात ठरल्यानुसार फिर्यादी कडून वेळोवेळी फोन पे व चेक द्वारे ३४ लाख ५ हजार रुपये घेतले. मात्र ठरलेल्या व्यवहारा प्रमाणे बिल्डींगची खरेदी न देता आणि पैसेही परत न करता फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी ७ जणांच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८, ३१६ (२), ३३८, ३४० (२), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### जाहीर नोटीस

तमांम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **स्मितम पोपट लोढा रा बुरुडगांव रोड, अहिल्यानगर** यांनी सदर मिळकती बाबत आमचे अशिलाबरोबर सौदा करून विसारापोटी रक्कम स्विकारुन सदर मिळकत कायम खरेदी देण्याचे कबूल केले आहे. लवकरच आमचे आशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत. सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेचा अथवा वित्तीय संस्थेचा कोणत्याही स्वरूपाचा बोजा नसून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** : डि. ।। अहिल्यानगर सब डि.।। तालुके नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे नालेगांव** येथील बिनशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

| गट नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ३६ | ३८ | २१९.९६ | प्लॉट नं.३७ | प्लॉट नं.४३ | प्लॉट नं.१९ | १२ मी.डीपी रोड |
| ही विद्यमान मालकाच्या मालकीची संपूर्ण खुली बिनशेती प्लॉट मिळकत. | | | | | | |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक खुली बिनशेती प्लॉट मिळकत यातील तदंगभुत वस्तुंसह, वागणुकीचे वहिवाटीच्या हक्कासह, रस्त्यासह, काहीही एक राखून न ठेविता असलेली मिळकत.

**अ‍ॅड.बाळासाहेब एन.कार्ले**
अहिल्यानगर
दि.२०/१०/२०२५
ऑफिस- बी ३, अमेय चेंबर्स, जुन्या जिल्हा न्यायालया शेजारी,
कोर्ट गल्ली, अहिल्यानगर, ९६५७२२९३३३

## सेवानिवृत्त परिवारातर्फे गरीब व गरजूंना कपडे वाटप



नगर – टाकळी ढोकेश्वर येथील सेवानिवृत्त परिवाराने दिवाळी सणानिमित्त माणुसकीची भिंत या उपक्रमाद्वारे गरीब, गरजू, भटके पाळावर व तांड्यावर जाऊन नवीन व जुन्या कपड्यांचे वाटप केले. या कपड्यांचे वाटप गावातील शंकर गायकवाड, संतोष चेमटे, शीला आल्हाट, भाना गांगुर्डे, विजय गायकवाड, सोन्याबापू आल्हाट, राजू झावरे, रंगनाथ बांडे, धोंडीभाऊ निवडुंगे, नामदेव आल्हाट व इतर २७ लोकांना वाटप करून, इतर कपड्यांचे वाटप पाळावर तसेच धनगर तांड्यावर जाऊन केले.

सेवानिवृत्त परिवारातील ज्येष्ठ सदस्य नारायण खिलारी गुरुजी मार्गदर्शक, तारकम झावरे, प्रा. किसनराव पायमोडे, पत्रकार बबनराव गायके, संजय कुसकर, सुभाष आवटी, प्रकाश गोरडे, सूर्यभान भालेकर, राजाराम उंडे, अ‍ॅड. बाबासाहेब खिलारी, भीमराज लोंढे, ओंकारेश्वर झावरे, मोहन हांडे, भाऊसाहेब गोरडे, बाबुराव नाईकवाडी, पोपट बोरुडे, रघुनाथ झावरे इत्यादी सदस्यांच्या हस्ते कपडे वाटप करण्यात आले. सदर उपक्रमासाठी तारकराम झावरे, संजय कुसकर, प्रा. किसनराव पायमोडे यांनी परिश्रम घेतले.



Elegance,
crafted for every celebration

THE Raymond SHOP

दुकान क्रमांक १,२,३, तळमजला, माऊली संकुल, सावेडी, अहिल्यानगर
0241-3353092

सुरक्षा तुमची... सर्व्हिस आमची....
CCTV Camera Set 12999/- फिटिंगसह
घर, दुकाने, हॉटेल, अपार्टमेंट, कॉलेज

द गोल्डन एंटरप्रायजेस
दिल्लीगेट, अहिल्यानगर
संपर्क–
7304099919

नियम व अटी लागू

॥ दीपावली शुभचिंतन ॥

सर्व सहलींची नाव नोंदणी सुरु झाली आहे.

अधिक मासाच्या पुण्यकालानिमित्त
श्री क्षेत्र नैमिषारण्य येथे
श्री शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा

ह.भ.प. श्री. जयंत महाराज गोरेडकर

रेल्वे प्रवास (AC, 3 टियर कोच)

अष्टविनायक दर्शन
दि. २३ ते २५ जानेवारी २०२६
अष्टविनायक दर्शनासह देहू, आळंदी
३ दिवस

कुरवपूर - पिठापूरम दर्शन (दत्तधाम)
दि. १५ ते २४ मार्च २०२६
१० दिवस

नर्मदा परिक्रमा
दि. ५ ते २१ जानेवारी २०२६
१७ दिवस

रेल्वे प्रवास (AC, 3 टियर कोच)

द्वारका दर्शन — एक धाम यात्रा
दि. १५ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०२५
११ दिवस

नेपाळ स्पेशल
दि. ३१ जाने. ते १३ फेब्रु.२०२६
प्रयागराज, अयोध्या, वाराणसी, गोरखपूर, लुंबिनी, पोखरा, भैरवा, काठमांडू, मनोकामना देवी, चितवण, पशुपतिनाथ, जनकपुरी, सितामढी इ.
१४ दिवस
बुकींग अंतिम दि. १५ ऑक्टोबर २०२५

जगन्नाथपूरी गंगासागर दर्शन — एक धाम यात्रा
दि. २८ फेब्रु. ते ८ मार्च २०२६
कलकत्ता, गंगासागर, भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाल, चिल्का सरोवर
९ दिवस
बुकींग अंतिम दि.१५ नोव्हेंबर २०२५

संपर्क श्री रेणुका ट्रॅव्हल सर्व्हिसेस (यात्रा कंपनी)
श्री. श्याम क्षीरसागर मो : 9922240515, 9405032698
सौ. दिपा जोशी मो : 8379841261, 9404401699

स्पेशल गुलाबजाम
जिलेबी । चुरमा
बुंदी लाडू । स्पेशल कंदी पेढे
। बेसन लाडू । खवा लाडू
चकली । बाकरवडी । करंजी । अनारसे
घरगुती लक्ष्मीपुजनासाठी मिठाई बॉक्स
गावरान तुपातील मिठाई मिळण्याचे एकमेव ठिकाण
खास दीपावली करिता
बन्सी महाराज मिठाईवाले
रामचंद्र खुंट, अहिल्यानगर
9860939981, 9881761101

CELEBRATING 35 Years
३५ वर्षे सेवा, विश्वास आणि गुणवत्तेची
आपणा सर्वांच्या विश्वासाच्या पाठबळावर
आम्ही ३६ वर्षे अर्थपूर्ण सेवा अविरत प्रदान करीत आहोत..
असाच दृढ विश्वास चिरंतर राहो हीच सदीच्छा...
दिपतेजाची आली दिवाळी.. नवसंकल्पांचे आले नवे वर्ष..
आनंदाने.. उत्साहाने स्वागत करू सहर्ष...

कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५१९८३.
Email : kailasnagari@gmail.com
सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार आपणा सर्वांना ही दिपावली सुख-समृद्धीची व भरभराटीची जावो हीच शुभकामना...

| दरमहा भरावयाची रक्कम | मुदतीनंतर मिळणारी रक्कम १ वर्ष | २ वर्ष | ३ वर्ष | ४ वर्ष | ५ वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| रूपये ५०० | ६३०० रू. | १३३२५ रू. | २१०५० रू. | २९६०० रू. | ३९०५० रू. |
| रूपये १००० | १२६०० रू. | २६६५० रू. | ४२१०० रू. | ५९२०० रू. | ७८१०० रू. |

लाभांश १२%
भागभांडवल २८.०५ लाख
ठेवी १५.१९ कोटी

ठेवीदारांसाठी आकर्षक ठेव योजना
अल्पमुदत ठेव खाते: ४६ दिवस ते १ वर्षाच्या आत द.सा.द.शे. ९%
मुदत ठेव खाते: १३ महिने ते २ वर्ष द.सा.द.शे. १०%; २५ महिने ते पुढे द.सा.द.शे. १०.५०%
दामदुप्पट ठेव योजना: ९० महिने
सोनेतारण कर्ज सुविधा: १२ %
वाहन कर्ज योजना: १५ %
१० ग्रॅम सोनेतारणावर रु. ७०,०००/-
MIS योजना १,२०,०००/- ठेव ठेवा व १०००/- रु. प्रत्येक महिन्याला व्याज मिळवा...
श्री. रखमाजी निस्ताने चेअरमन / संस्थापक
श्री. चंद्रकांत औशीकर व्हा. चेअरमन
संचालक मंडळ - श्री. सागर चवंडके, श्री. अनंता ओशिकर, श्री. जगन्नाथ बहिरवाडे, श्री. अमोल निस्ताने, श्री. रोहिदास नामदे, श्री. रामा विधाते, सौ. उषाताई खताडे, श्रीमती जयश्री विडकर, श्री. संतोष पिंपर, श्री. शंकर मिसाळ (सेक्रेटरी) • तज्ञ संचालक - श्री. सुभाष भागानगरे, श्री. होनाजी गोडळकर • तक्रार निवारण समिती - सुभाष झुल्वेकर, गंगाधर सोनवणे
कर्मचारी वृंद - सचिन दिवटे, अजिक्य कलगाते, तुषार विधाते, गणेश भुजबळ



दिपावली व पाडव्यानिमित्त
सर्व ग्राहक हितचिंतकांना
हार्दिक शुभेच्छा !
आपल्या स्नेह व सहकार्याच्या पाठबळावर
५३ व्या वर्षात पदार्पण करीत आहोत.
सुवर्ण संचय योजना
ADN
मेट्रोचे सुपरफास्ट गोल्डलोन फक्त २० मिनिटात
अशोक दत्तात्रय नांदुरकर (सराफ)
भाजी मार्केट जवळ, गोल्डन अपार्टमेंट, गंज बाजार, अ.नगर.
मो. ९०२८०५७४३८, ९९२१९९७७९०




पाचवे पुण्यस्मरण

आपने सबको दिया दुलार
आपकी स्मृतियां है अब आधार,
आपके कर्म प्रेरणा है हमारी
आपका व्यवहार हमारा सुत्रधार ।

आपकी पाचवे पुण्यतिथि पर हम
सभी परिवार जन आपको
अश्रुपूरित श्रध्दांजलि
अर्पित करते हैं ।

स्व. किर्तीभाई गांधी
स्वर्गवास २३.१०.२०२०

श्रध्दावन्त
गांधी बी वाले
एवम् परिवार

॥ १३ वे पुण्यस्मरण ॥



चंदनापरी देह झिजविला,
कष्टातुनी वसंत फुलविला,
नाही उरली साथ आम्हाला,
आठवण येते क्षणाक्षणाला..

आपल्या पवित्र स्मृतीस
भावपुर्ण श्रद्धांजली!

दु:खांकित
अविनाश रामदास दळवी
मयुर अविनाश दळवी । सौ. सोनल मयुर दळवी
संदिप अरुणशेठ बोराटे । सौ. स्नेहा संदिप बोराटे
कु.तनिष्का । कु.श्रिक्षा । कु.अधिराज

कै. सुरेखा अविनाश दळवी
(स्वर्गवास दि. १३/११/२०१२ (लक्ष्मीपुजन)

समस्त दळवी परिवार




17 ते 26 ऑक्टो. 2025
सुवर्ण खरेदीवर दररोज
स्मार्ट फोन
जिंकण्याची सुवर्णसंधी
व्हा स्मार्ट ग्राहक
दररोज एक स्मार्टफोन जिंकण्याची संधी
आपल्या नात्यातील आनंद द्विगुणित करण्यासाठी घेऊन आलो आहोत.
एक अनोखी ऑफर दागिन्यांच्या खरेदीवर स्मार्टफोन जिंकण्याची सुवर्ण संधी.
१९३७ पासुन अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विश्वासाची परंपरा सार्थ करणारे
सत्यम् शिवम् सौंदर्यम्
एस.जी. कायगांवकर
सुवर्ण क्षणांसाठी
स्थापना 1937 SGK JEWELLERS
सराफ बाजार 2341333, 9890032323 सावेडी 2341335, 9511902345
• दिवाळीनिमित्त बुधवारी शोरूम खुले राहिल • सावेडीत प्रशस्त पार्किंग • कॉर्पोरेट गिफ्ट व्हाऊचर
नियम व अटी लागू